# माणूस

साप्ताहिक



स्तीकरणाच्या
ट छायेत
मंतक

० पैसे

-२-१९६७

माणूस

## एक समग्र साप्ताहिक


वर्ष : सहावे
अंक : पस्तिसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत


# पत्र-मैत्री

स. न. फेब्रु. १८

दि. १८ फेब्रु. १९६७ चे 'माणूस' अंकात निवडणुकीविषयीची 'व्यंगचित्रे', 'निवडणूक एक पाहणी', 'एक सिंहावलोकन' व 'एक दृष्टिक्षेप' हे विशेष लेख प्रसिद्ध झाल्याने 'माणूस'चा हा छोटा निवडणूक विशेषांकच वाटतो. सध्या अनेक फसवे फतवे प्रसिद्ध होतात, परंतु 'माणूस' साप्ताहिकासारखे लेख अन्यत्र वाचावयास मिळत नाहीत, यातच 'माणूस'ची अभूतपूर्व लोकप्रियता सामावली आहे. 'माणूस'ने आपल्या 'वहिर्जीमार्फत' निवडणुकीनंतर भारतीय राजकारणावर विदारक प्रकाश टाकणारे लेख अवश्य प्रसिद्ध करावेत.

**– ज. बा. बडदे, पुणे.**

स. न. फेब्रु. २४


अलिकडे 'माणूस'चा प्रत्येक अंक वाचनीय असतो. श्री. सदाशिव पेठकर यांचे 'दिल्ली दरबार'मधील लेखन मार्मिक व सत्यस्थिती-निदर्शक असते. त्यांनी लेखात उल्लेखिलेला 'लंडन टाइम्स'चा वातमीदार नेव्हिल मॅक्स्वेल याचे संपूर्ण इंग्रजी भाकित मुद्दाम मिळवून 'माणूस'च्या पुढल्या अगर एखाद्या अंकात लौकरच द्यावे. 'नाझी भस्मासुराच्या उदया'सारखी एखादी दमदार लेखमाला पुन्हा 'माणूस'मध्ये सुरू करा.

**– डी. व्ही. गद्रे, सांगली.**

# सत्ताधारी जेव्हा उद्दाम होतात...

एखादा दिवस असा येतो की, त्या दिवशी सारा चेहरा-मोहराच बदलून जातो. गेला गुरुवार हा असाच एक संस्मरणीय दिवस ठरला. काँग्रेस पक्षाचा चेहरा-मोहरा त्या दिवशी पार बदलून गेला. आम्ही दगडाला उभे केले तरी त्याला निवडून आणू शकतो, ही आतापर्यंत काँग्रेसवाल्यांची भाषा असे. ( काही चाणाक्ष काँग्रेस-नेते प्रत्यक्ष तसे उद्गार काढीत नसत; पण वृत्ती मात्र त्या उद्गारांना साजेशी असे. ) काँग्रेस-नेत्यांचा या उद्दाम वृत्तीस गेल्या गुरुवारी सणसणीत थप्पड बसली. निवडणूक-प्रचाराच्या काळात विरोधी पक्षांबद्दल अवहेलनेचे उद्गार काढण्यात काँग्रेसवाल्यांत जणू चुरसच लागली होती. 'देहली बहोत दूर आहे' असे मोठ्या मुजोरपणाने ते विरोधकांना सांगत होते. जंतरमंतर रोडवरच्या काँग्रेस-कचेरीत वातावरणाला या उद्दामपणाचा सारखा दर्प येत होता; परंतु गेल्या गुरुवारी कामराजांच्या पराभवाचे वृत्त जाहीर झाले तेव्हा ही कचेरी कमालीची केविलवाणी दिसत होती. प्रथम या बातमीवर कोणाचा विश्वासच बसेना. पं. नेहरूंच्या निधनानंतर कामराजांनी स्वतः-कडे सूत्रधाराची भूमिका घेतली होती. प्रधानमंत्र्याच्या खुर्चीला हात कोणी लावायचा हे ठरविण्याचा अधिकार व हा अधिकार राबविण्याचे सामर्थ्य केवळ आपल्यापाशी आहे, असा त्यांनी देशभर दबदबा निर्माण केला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जी शान पार नाहीशी झाली होती ती पुन्हा मिळविली कामराजांनी. तेव्हापासून त्यांच्या अबोल स्वभावामुळे (आणि इंग्रजी-हिंदीच्या अज्ञानामुळे) कामराजांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती गूढतेचे वातावरण निर्माण झाले होते. असे हे कामराज एका यःकश्चित तरुणाकडून पराभूत होतात; ही वस्तुस्थिती प्रथम कोणीच मान्य करीना. परंतु आकाशवाणीवरून जेव्हा ही बातमी जाहीर करण्यात आली तेव्हा मात्र देशाची सूत्रे आपल्या हाती आहेत अशी शेखी मिरविणाऱ्या जंतरमंतर रोडवरच्या काँग्रेस कचेरीचा चेहरा-मोहरा पार बदलला. त्या वेळी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांना कोणीसे विचारले, "इंदिराजी, काय, घडतंय काय ?" त्या उद्गारल्या, "सच कहूँ, कुछ समझमें आता नहीं."

गुरुवारी एकामागून एक निकाल जाहीर झाल्यापासून काँग्रेस–नेतेच काय पण विरोधी पक्षाचे नेतेही "कुछ समझमें आता नहीं" असेच म्हणत होते. स. का. पाटील पडले, अतुल्य घोष कोसळले, सुब्रह्मण्यम पराभूत झाले, मनुभाई शहा हरले अशा एका-



मागून एक अक्षरशः हादरा देणाऱ्या बातम्या त्या दिवशी ऐकावयास मिळत होत्या.

भूकंपाचा धक्का बसताच गांगरून सैरावरा धावत सुटावे आणि सुरक्षित जागा पाहून जरा कोठे थांबावे तो तेथेही पुन्हा धक्का जाणवू लागावा, अशी या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची परिस्थिती झाली. पं. नेहरूंसारख्या, अनभिषिक्त सम्राटाच्या निधनानंतरची ही पहिलीच निवडणूक, त्यामुळे तिला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालेले. त्यातून निवडणूक होते किंवा नाही, अशी शंकाकुल परिस्थिती अगोदर निर्माण झालेली. या निवडणुकीतून भारतातील लोकशाही उजळून निघेल असा काहींचा आशावाद तर ही शेवटचीच निवडणूक ठरेल, अशी दुसऱ्या काहींनी भाकिते वर्तविलेली. परंतु निवडणूक झाली. अगदी शांतपणे पार पडली. एक केरळचा अपवाद सोडला तर बाकी सर्व ठिकाणी काँग्रेसच्या पासंगास कोणी पुरणार नाही, असे मतदान आटोपल्यानंतर सांगण्यात आले. परंतु जे काही घडले ते अगदी अनपेक्षित. हे निकाल सत्ताधारी पक्षाला जितके अनपेक्षित होते, तितकेच विरोधी पक्षांनाही अनपेक्षित होते ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

## धक्क्यापाठोपाठ धक्के

काँग्रेसला पहिला हादरा बसला तो खुद्द राजधानीतच. लोकसभेच्या सात जागांपैकी सहा जागा जिंकून जनसंघाने—इंदिरा गांधी यांनी फॅसिस्ट म्हणून बदनाम केलेल्या पक्षाने—काँग्रेसला पहिला तडाखा हाणला. या धक्क्यातून काँग्रेस नेते स्वतःला सावरतात न सावरतात तोच नंबुद्रिपाद—गोपालन आणि मंडळींनी केरळात दुसरा टोला हाणला. लोकसभेच्या केरळमधील एकोणीस जागांपैकी अठरा जागा डाव्या पक्षांच्या संयुक्त आघाडीला मिळाल्या. केरळ विधानसभेची आता जेव्हा बैठक भरेल, तेव्हा तेथे बसलेल्या १३३ सदस्यांपैकी काँग्रेसचे नऊ सभासद कोठे बसले आहेत हे शोधावे लागेल. भारताच्या दक्षिण टोकावरचे हे चिमुकले राज्य काँग्रेसच्या हातातून पूर्णपणे निसटले असून त्यावर डाव्या कम्युनिस्टांचे प्रभुत्व प्रस्थापित झाले आहे. अर्थात त्यासाठी त्यांना मुस्लिम लीग या धर्मांध पक्षाशी हातमिळवणी

करावी लागली. (मुस्लिम लीगला नवजीवन देण्याचे 'पुण्यकर्म' डाका कम्यु-निस्टांप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्र समितीनेही केले आहे!)

स्वतंत्र पक्षाने राजस्थान आणि गुजरात या दोन राज्यांमध्ये अतिशय नेत्रदीपक यश मिळविले असून ओरिसा, आंध्रप्रदेश या राज्यांतही त्यांनी आपला पाया घट्ट केला अहे. उत्तर प्रदेश व मध्यप्रदेश या राज्यांत जनसंघाने प्रमुख विरोधी पक्ष म्हणून आपले स्थान बळकट केले आहे. त्या मानाने राजस्थान व हरियाना या दोन राज्यांत हा पक्ष अपेक्षित यश संपादन करू शकला नाही. केरळच्या खालोखाल काँग्रेसला जबरदस्त हादरा दिला तो मद्रासने व पश्चिम बंगालने. बंगालमध्ये काँग्रेसने १२७ तर विरोधी पक्षांनी १५३ जागा जिंकल्या आहेत. अतुल्यबाबूंचा पश्चिम बंगाल त्यांच्या पंखाखालून बाहेर पडला आहे.

जी गोष्ट अतुल्यबाबूंच्या बंगालची तीच कामराजांच्या मद्रासची. राजाजींना सत्ताभ्रष्ट करण्यासाठी कामराजांनी ज्या द्रविड मुन्नेत्र कळघमला हाताशी धरले. त्याच कळघमने आता भस्मासुराप्रमाणे कामराजांच्या डोक्यावर हात ठेवला. मद्रासमध्ये कळघमला १३८ तर काँग्रेसला अवघ्या ४९ जागा मिळाल्या आहेत. भारतापासून फुटून निघण्याची मागणी करणारा हा पक्ष अधिकारारूढ होणार असल्यामुळे एकात्म भारताच्या दृष्टीने केरळप्रमाणेच मद्रास ही आता नवी डोकेदुखी ठरणार आहे.

सर्व राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रामध्ये (मुंबईच्या पाटलांच्या पराभवाचा अपवाद सोडला तर) काँग्रेस पक्षाने भरीव यश संपादन केले आहे. आतापर्यंत हा मान मोरारजींच्या गुजरात राज्याकडे असे; परंतु स्वतः मोरारजी देसाई निवडून आले असले तरी आता गुजरात राज्यात स्वतंत्र पक्षाने काँग्रेस पक्षाला चांगलेच तडाखे हाणल्यामुळे मोराजींची प्रतिमा पहिल्याइतकी खंबीर राहिलेली नाही. गुजरातमध्ये काँग्रेसने ९२ तर स्वतंत्र पक्षाने ६६ जागा मिळविल्या आहेत.

एकंदर निवडणूक निकालाकडे धावता दृष्टिक्षेप टाकला तर असे दिसते की सतरा राज्यांपैकी आठ राज्यांत काँग्रेस पक्षाने निर्विवाद बहुमत गमावले असून लोकसभेमध्येही या पक्षाचे बळ बरेच ओसरले आहे. लोकसभेमध्ये विरोधी पक्षांचे दोनशेहून अधिक सभासद निवडून आले असून त्यांत गोपालन्, डांगे, लोहिया, मधू लिमये, अटलबिहारी बाजपेयी, बलराज मधोक, मिनू मसानी, नारायण दांडेकर, अशा कर्तृत्व आणि वक्तृत्वसंपन्न विरोधकांपुढे आधीच हतबल झालेल्या काँग्रेस पक्षाला उभे राहावयाचे आहे.

## गटशाहीविरुद्ध संताप

चमत्कारांतच जमा व्हावी अशी ही घटना घडली कशी? जो तो आपापल्या परीने अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असला तरी एक गोष्ट नक्की की काँग्रेस पक्षा-

बद्दल म्हणजेच त्या पक्षातल्या उद्दाम नेतृत्वाबद्दल सर्वसामान्य जनतेला जी चीड आली आहे, तिचा परिपाक या निवडणुकीत् दिसून आला. सत्ताधारी पक्षातील सूत्रधार जनतेपासून एवढे दूर गेले आहेत व जनहिताबद्दल ते इतक्या बेफिकीर वृत्तीने वागत आहेत की, 'तुमचा होतो खेळ पण आमचा जातो जीव' अशा त्राग्याने मतदारांनी अतिरथी-महारथींना पराभूत करून आपला प्रक्षोप प्रकट केला आहे. 'डावीकडे कल,' 'उजवीकडे कल' अशा सांकेतिक आणि आता अर्थशून्य ठरलेल्या ठोकळेबाज शब्दसंहितेने या जनरोषाचे निदान करता येणार नाही. 'गार्डियन' पत्राने असे म्हटले आहे की, काँग्रेसच्या गटशाही (Oligarchy) विरुद्ध भारतीय जनमत खवळले असल्यामुळेच काँग्रेसचा अकाळविकाळ आणि सर्वभक्षक मोनोलिथ' मतांच्या घणांनी छिन्नभिन्न करून टाकण्यात भारतीय जनमताने आपल्या क्रोधाचे प्रदर्शन घडविले आहे.

जनमताचा हा क्रोध काँग्रेस-नेते यापुढेही तरी ध्यानात घेणार आहेत किंवा नाहीत, हाच खरा प्रश्न आहे. मला वाटते, इंदिरा गांधी परिस्थितीची पावले कोणत्या दिशेने पडत आहेत हे ओळखण्याइतक्या चतुर आहेत. मोरारजी देसाई आणि यशवंतराव चव्हाण यांचे हार्दिक सहकार्य मिळेल तर या झंझावातातूनही त्या मार्ग काढू शकतील. श्री. चव्हाण आज जरी इंदिरा गांधींच्या पाठीशी उभे असले तरी मोरारजी देसाई यांचे मंत्रिमंडळातील पुनरागमन त्यांना कितपत रुचेल, याची शंका आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंत्रिपदाची महत्त्वाकांक्षा बाळगणारे मोरारजीभाई साऱ्या भारतभर काँग्रेस पक्षाचा खुर्दा झाल्यानंतर समजूतदारपणा दाखवून प्रधानमंत्रिपदाचा आग्रह न धरता 'क्रमांक दोन'चे सहकारी म्हणून मंत्रिमंडळात येण्याची तयारी दर्शवितात की नाही, हे आजच सांगता येणार नाही; परंतु एकंदर परिस्थिती पाहता आजच्या ढासळत्या परिस्थितीत प्रधानमंत्रिपदासाठी मुकाबला करण्याचा हट्ट मोरारजीभाई दाखविणार नाहीत, अशी अपेक्षा आहे. त्यांच्यासारख्या कणखर व्यक्तीला 'क्रमांक दोन'वर राहूनही इंदिरा गांधी यांच्या धोरणावर प्रभावी नियंत्रण ठेवता येईल व त्याचबरोबर देशात सुस्थिर वातावरण निर्माण करता येईल. प्रधानमंत्रिपदापासून फार जवळ उभ्या असलेल्या मोरारजींना व चव्हाणांना तूर्त तरी या पदापासून दूर राहणेच हितकर ठरेल. इंदिरा गांधी, मोरारजी देसाई व यशवंतराव चव्हाण हे त्रिकूट कितपत एकत्र येते यावरच यापुढच्या पाच वर्षांची वाटचाल अवलंबून आहे. अगदी थोड्या दिवसांत या प्रश्नाचे उत्तर मिळणार आहे.

●

—सदाशिव पेठकर

४ मार्च १९६७

# मुक्ताफळे



## □ सर्वोदयी निवडणुका

१. " निवडणुकांना जरी कितीही महत्त्व दिले तरी शेवटी ती अशी वस्तू नाही, की तिने समाजाच्या उत्थानाला काही मदत होईल. "

२. " हे अगदी स्पष्ट आहे की, पं. नेहरूंना एक मत आहे व त्यांच्या चपराशालाही एकच मत आहे. यात कोणती अक्कल आहे मला माहीत नाही. "

३. " ज्या जातिभेदावर राजा राममोहन रॉयपासून महात्मा गांधींपर्यंत सर्वांनी प्रहार केले आणि जो जातिभेद मोडकळीस आला होता तो आज इतका का वाढला ? या निवडणुकींनी जातिभेदाला प्रोत्साहन दिले आहे. "

४. " ज्याच्याजवळ पैसा आहे तोच या निवडणुकीत भाग घेऊ शकतो. अशा स्थितीत गरीब आणि मूक अशा जनतेच्या शब्दांचा काय परिणाम होणार ? "

५. " हल्ली प्रत्येक गोष्टीत ' फाईट ' करण्याची सवय झाली आहे. मी किती वेळा सांगितले, की निवडणूक लढता काय ? निवडणुक खेळली पाहिजे. "

सगळा देश लोकशाही समाजवादी कॉंग्रेसच्या लाडक्या नेत्यांना निवडण्याच्या उद्योगात असताना विनोबाजींनी निवडणुकांबाबतचे हे पंचशील सांगितले. पंचा नेसणाऱ्यांनी निवडणुकीच्या शीलाची अशी चेष्टा करावी हे आम्हांला मुळीच सहन झाले नाही. परंतु एकदा सगळ्या रस्त्यांत बैलजोडी उभी झाली की मग विनोबांना उत्तर देऊ, असे आम्ही ठरवले होते. हाती आलेल्या निकालांनुसार त्रिपुरा, म्हैसूर, आंध्र, आसाम, महाराष्ट्र, गुजरात मध्यप्रदेश, हरियाना, या ठिकाणी बैलजोडी आली असून, पंजाब, बंगाल, राजस्थान येथे एकच बैल आलेला आहे. मद्रासमध्ये फक्त चार शिंगे आली असून दिल्ली व केरळ येथे फक्त बैलांची शेपटे उरली आहेत. परंतु कॉंग्रेस हा अखिल भारतीय पक्ष आहे, हे या निवडणुकीने निर्विवादपणे सिद्ध केले आहे. आता विनोबांना या निवडणुकींनीच परस्पर उत्तर दिले आहे.

निवडणूक ही जर अशी वस्तू नसती की जिने समाजाचे उत्थान होईल तर तळहाताने नाक धरून, जीव धोक्यात घालून थोर थोर नेत्यांनी निवणुकांच्या सभा कशाला घेतल्या असत्या ? निवडणूक झाली नाही तर सरकार कसे येणार ? सरकार नाही तर योजना कोण करणार ? योजना नसल्या तर कर्ज कोण करणार ? विनोबांनी काही काही सांगून उच्छृंखलाय ढेबर, जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या लोकांना निवडणुकीपासून दूर नेले, पण देशाचे नशीब म्हणून इंदिराजी, यशवंतरावजी, स. का. पाटील, कामराज, मोरारजी यांच्यासारख्यांनी निवडणुकीत हिरीरीने भाग घेतला. निवडणुकीत पडल्यावर किंवा राजकारणात कुणी विचारत नाहीसे झाल्यानंतर सर्वोदयी काम शिल्लक राहणार आहे ! त्यासाठी ऐन उमेदीची वर्षे फुकट घालवण्यात काय अर्थ आहे ?

पंडित नेहरूंना एक मत आणि त्याच्या चपराशालाही एक मत यांत कोणती अक्कल आहे, असे विनोबा विचारतात ! वयात आलेल्या प्रत्येक माणसाला इतर काही देता आले नाही तरी काँग्रेसने मत दिले आहे. अंगावर फक्त लंगोटी लावून रांगेत मतदानासाठी उभ्या असलेल्या अर्धनग्न गिरीजनांच्या, वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या छब्या पाहून आमच्या अंगावर रोमांच आले ! वीस वर्षांत काँग्रेसने सगळ्यांना मत दिले, ही काय लहानसहान गोष्ट आहे ! कपडा व अन्न हे काय कोणीही देईल. विनोबांच्या नादी लागून या मंडळींनी मते मागायला आलेल्यांना धक्के मारून गावाबाहेर काढले असते म्हणजे ? परंतु लोकशाही समाजवादाच्या वाटचालीतले हे प्रवासी इतके दुधखुळे नाहीत. पुरेसे अन्न नाही, अंगावर वस्त्र नाही, पण माणसे मतदानाला आली; कारण त्यांना माहीत आहे की इंदिराजींना, अतुल्य घोषांना, डांग्यांना एक मत आणि आपल्यालाही एक मत आहे, ही समानता महत्त्वाची आहे. पंडित नेहरूंना एक मत आणि त्यांच्या चपराशालाही एक मत यांतला महान अर्थ विनोबांनी ध्यानात घेऊ नये हे देशाचे दुर्दैव होय. शिवाय इथे आता कुणी कुणाचा चपराशी नाही. समाजवादात हे मुळी बसतच नाही.

आता निवडणुकांनी जातिभेद वाढला. जो तो जातीचा विचार करतो. जात पाहून मते दिली जातात, असा विनोबांचा तिसरा आरोप आहे. आम्हांला हे कळत नाही की काँग्रेसच्या उमेदवारांत जातीशिवाय पाहण्यासारखे दुसरे काय आहे ? जातसुद्धा पाहिली नाही तर पाहायचे काय ? निवडून येण्यासाठीच समाजकार्य केले तर निवडून आल्यावर करायचे तरी काय ? नुसती जाती पाहून मते दिली जातात; कारण शिक्षणाचे प्रमाण अजून पुरेसे वाढलेले नाही. वीस वर्षे काँग्रेसने ग्रामगौरव केले तरी अशिक्षितता जात नाही. अशिक्षित माणूसही जात घेऊन जन्माला येतो. वय वाढले की त्याला मत येते. मग तो मतदानाच्या वेळेस दुसरे काय पाहणार ? जातिभेद मोडकळीस आला होता, असे विनोबा म्हणतात.

कधीची बातमी आहे ? महाराष्ट्रापुरते बोलायचे तर १९४८ सालापर्यंत तरी अशी मोडतोड झाल्याचे आपल्याला माहीत नाही. ‘ जाति ’ राहण्यात फक्त ‘ भेद ’ नसावा इतपतच प्रगती तूर्त झालेली आहे. म्हणून फलटणच्या राजेसाहेबांची यशवंतरावजी चव्हाणांनी जाहीर माफीदेखील मागितली. परंतु अखेर फलटण-करांचे व्हायचे तेच झाले !

विनोबांचा चौथा आरोप तर कमाल आहे. निवडणुकांना पैसा लागत असता तर शेतकऱ्यांची मुलं महाराष्ट्रात इतक्या मोठ्या संख्येने आली असती निवडून ? शेतकरी तर नक्की गरीब आहे. यशवंतरावजी, बाळासाहेब देसाई ही शेतकऱ्यांची मुले जशी निवडून आली त्याप्रमाणे इतरही अनेक भूमिपुत्रांचे पुत्र निवडून आले आहेत. आता यांतले काही वकील, प्राध्यापक आहेत. हे शेती कधी करतात असे कुणी विचारील. परंतु कुळकायद्यामुळे यांना शेती करणे शक्य नाही ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. कसेल त्याची जमीन असल्याने व ही मंडळी राज-कारणात आल्याने यांना तूर्त जमीन नाही म्हणून ते प्रत्यक्ष शती करीत नाहीत इतकेच. संध्या न करता, खाण्या–फिरण्याचा विधिनिषेध न पाळता, वाटेल तो व्यवसाय करून अनेक मंडळी ब्राह्मण म्हणून मिरवतात, तसेच आता पुष्कळजण शेतकरीपुत्र म्हणवतात यात काहीच चूक नाही.

विनोबांचा पाचवा आरोप आहे की प्रत्येकजण निवडणूक लढवतो व लढतो. ‘ फाईट ’ करतो ही कटुता का ? निवडणूक खेळली गेली पाहिजे. हे कसे शक्य आहे ? खेळात जिकण्याहरण्याला महत्त्व असते ते फक्त चुरस निर्माण होण्यापुरते. तसा खेळ हा खेळासाठीच खेळला जातो. निवडणुकांचा निकाल महत्त्वाचा असतो. फक्त २५ हजार रुपये खर्च करण्याची परवानगी असताना लाख लाख रुपये निव-डणुकांत खर्च करावे लागतात. निवडून आलेल्यांना पुढच्या पाच वर्षांत ही सर्व रक्कम मिळण्याची संधी येते. पडेल त्यांना पाच वर्षे या हरवलेल्या संपत्तीमुळे टिपे गाळावी लागतात! निवडून आलेल्या माणूस जातीचे नाते जुळले तर मंत्रीदेखील होतो. माणूस मंत्री झाला की सत्ता हाती येते. मग त्याला सर्व माणसे हुजऱ्या-सारखी ‘ साहेब ’ म्हणू लागतात. सरकारी यंत्रणा त्याची बटिक होते. कसलीही बंदी त्याला लागू राहू शकत नाही. पाच वर्षे ही धुंदी त्याला पुरते. अशा या महत्त्वपूर्ण निवडणुकीकडे खेळ म्हणून कसे पाहता येईल? ही ‘ फाईट ’च आहे. अशी फाईट आहे की “ लायक माणूसच लागतो ” हे तत्त्व येथे लागू नाही. या लढाईत दगडफेक करावी लागते. प्रतिद्वंद्वी उमेदवारांच्या प्रचारकांचे हातपाय जायबंदी करावे लागतात, पैसे पेरावे लागतात, जेवणे घालावी लागतात, तेव्हा निवडणूक खेळणे कुणालाही शक्य नाही. हा मामला किती भयंकर असतो याची विनोबांना कशी कल्पना येणार ? त्यांना इतर ‘ दानां’ची माहिती असेल फार तर! पण ‘ मतदान ’ हे काही वेगळं दान आहे.

## □ कामराज पतन

काँग्रेसचे अध्यक्ष कामराज हे निवडणुकीत पराभूत झाल्याचे भीषण वृत्त आले आहे. हिंदीविरोधी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या श्रीनिवासन नावाच्या विद्यार्थ्याने त्यांना पाडले. सर्वांत कमीत कमी भाषा तोंडातून काढणारा महान नेता भाषेच्या प्रश्नावर पडावा हे दुर्दैव होय! कामराज पडल्यामुळे देशाच्या राजकारणात त्याचे जे काय परिणाम होतील ते होवोत, परंतु क्रेमलिनमध्ये हाहाःकार झाला आहे. रशियन दौऱ्यात कामराजांचे जे उत्स्फूर्त स्वागत रशियन जनतेने केले त्याचे फोटो आपण पाहिलेले आहेतच. त्या उत्स्फूर्त स्वागताचा कर्ताकरविता धनी कोसिजीन होता. भारताचा हा नेता पडल्याचे वृत्त क्रेमलिनमध्ये पोचताच कोसिजीन यांना तर मूर्च्छा आली. सगळा प्रेसिडियम त्यांच्याभोवती जमला. कॉम्रेड डांगे यांना फोन करण्यात आला. "हे कसे झाले?" कॉम्रेड डांगे यांनी फोनवर कळवले. "मी निवडून आलो आहे. कोसिजीन यांचे कानात पोसिजीन साहेबांनाही (जॉन्सन साहेबांना) मूर्च्छा आल्याचे सांगा म्हणजे ते शुद्धीवर येतील. सदोबा पडल्याचे वाचून पोसिजीन जॉन्सनही कालपासून मूर्च्छित आहेत!"

स. का. पाटील, अतुल्य घोष, कामराज आणि कृष्ण मेनन हे निवडणुकीत पडल्याने त्याचे दूरगामी परिणाम ह्या देशाला भोगावे लागणार आहेत. कॉम्रेड डांगे व मोरारजीभाई निवडून आल्यामुळे शुद्धीवर येताच कोसिजीन व पोसिजीन भारतावर पूर्ववत प्रेम करू लागतील, अशी आशा करण्यापलीकडे आपल्या हाती काय आहे?

—ग्यानबा


**घाटगे आणि पाटील**

राजाराम रोड | धारवाड रोड | वखार भाग | कोप्पीकर रोड
**कोल्हापूर** | **बेळगाव** | **सांगली** | **हुबळी**

**अॅम्बेसडर कार्स । बेडफोर्ड ट्रक्स । जीप्स । मॅसी-फर्ग्युसन ट्रॅक्टर्स ।**
**लॅम्ब्रेटा – स्कूटर्स – रिक्षा । पर्किन्स डिझेल इंजिन्स ।**
**रॅले – रज – हंबर – रॉबिनहुड – हरक्युलस – बायसिकल्स,**
**ऑल्विन प्रेस्टकोल्ड रेफ्रिजरेटर्स । स्लॉटेड अँगल्स ।**
**जेन्युइन – स्पेअर – पार्टस व निर्दोष – रिपअर्स**

**घाटगे आणि पाटील**

**टिळक रोड, पुणे ९**

समीर

# विचार वारे

## □ स्वस्त घरांची योजना

आधुनिक जगापुढे उभ्या असलेल्या निरनिराळ्या समस्यांवर सखोल विचार प्रकट करणारे विचारवंत निरनिराळ्या देशांतून भारताला सारखे येत असतात. पण थोड्या दिवसांपूर्वी दिल्लीला यऊन गेलेले श्री. आर्थर फर्नांडो हे सिलोनी तज्ज्ञ तत्त्वचिंतन न करता सामान्य जनतेच्या एका गंभीर समस्येचे रोख उत्तर देणारी माहिती पुरवून गेले. ती समस्या म्हणजे घरांचा तुटवडा.

आपल्या देशात स्वस्त किंमतीच्या घरांचा " पूर " आणण्यासाठी त्यांनी अशा पद्धतीचे कॉंक्रीटचे ठोकळे तयार केले आहेत की ते जोडून चार माणसांना अवघ्या २४ तासांत छोटेखानी घर बांधता येते. हे घर बांधायला गवंडी लागत नाही, सुतार लागत नाही आणि इंजिनीयरही लागत नाही. किंमत लहान घराची ३,३०० रुपये. त्याहून जरा मोठ्याची ५,००० रुपये.

नेहमीची घरे जोरदार वादळात पडू शकतात, पण हे घर कितीही जोराचे वादळ झाले तरी कोलमडणार नाही. दिल्लीत जी नवीन घरे बांधली जात आहेत, त्यांतले एकही खऱ्याखुऱ्या वादळापुढे टिकाव धरू शकणार नाही. या नवीन पद्धतीच्या घराची बांधणी सोपी व्हावी, म्हणून कॉंक्रीटच्या लाद्या तयार केल्या आहेत. लादीचे वजन जास्तीत जास्त दोन माणसांना उचलता येईल एवढे असते व प्रत्येक लादीवर खूण केलेली असते. त्या खुणा पाहून त्या लाद्या एखादे कोडे जुळवावे तशा जुळवल्या की घर तयार होते. कोड्यात व या घरबांधणीत फरक एवढाच की कोठली लादी कोठे बसवायची हे सहज कळते.

आश्चर्य असे की या योजनेला सिलोन सरकारचा पाठिंबा नाही. सरकारी पाठिंबा मिळाला तर जकातीत सवलत व इतर अशाच सवलती मिळून घराची किंमत एक–तृतीयांश कमी होऊ शकेल. या योजनेत हिंदुस्थानी मंडळींचे सहकार्य मिळायला हवे. " इकडेदेखील घरांचा चांगलाच तुटवडा आहे. "

## □ सोव्हिएट दृष्टिकोनातून भारतीय तत्त्वज्ञान

भारतीय विचारवंतांनी जगाच्या तत्त्वज्ञानात जी भर टाकली आहे, तिच्याकडे पुष्कळदा दुर्लक्ष केले जाते; पण ही परिस्थिती बदलली पाहिजे, असे डॉ. लिट्मन

या सोव्हिएट पंडिताचे मत आहे. सांस्कृतिक देवाण–घेवाणीच्या कार्यक्रमात गेले तीन महिने दिल्लीत वास्तव्य करून असलेले डॉ. लिट्मन म्हणतात, पौर्वात्य लोकांनी, विशेषत: भारतीयांनी, पूर्वीच नव्हे तर आधुनिक काळातही तत्त्वज्ञानाच्या विकासाला खूप हातभार लावला आहे व तो जगापुढे आणणे हे महत्त्वाचे काम आहे.

अर्थात पश्चिमात्य तत्त्वज्ञानी मंडळींनी हे कबूल करायला काही काळ जावा लागेल; कारण एकतर त्यांच्यापैकी बऱ्याच जणांना जन्मापासून 'अधिकगंड' झालेला आहे व दुसरे म्हणजे त्यांच्यावर हेगलसारख्या विचारकांच्या मतांचा पगडा आहे. भारतीय व चिनी तत्त्वज्ञानाने जागतिक तत्त्वज्ञानाच्या विकासाला काही मदत केलेली नाही, असे हेगलचे मत होते; पण ही 'युरोप केंद्रवादी' कल्पना सोव्हिएट पंडितांना मान्य नाही. भारतीय तत्त्वज्ञान भक्कम मानवतावादी मूल्यांवर आधारलेले असल्याने त्यांच्या मते भारतीय तत्त्वज्ञान व मार्क्सवाद यांच्यांत विरोध नाही. उलट 'खऱ्या मार्क्सवाद्यां'ना भारतीय तत्त्वज्ञान सहज पटते.

एक लक्षात ठेवण्याजोगे मत भारतात हृषिकेश येथे किंवा खेडोपाड्यांतून जे साधू व स्वामी राहताना दिसतात त्यांच्यांत अनेक सॉक्रेटिस व प्लेटो आहेत!

## □ परीकथांच्या शोधात

भारतातील काही निवडक परीकथांचे व लोककथांचे जर्मन भाषेत भाषांतर करावे म्हणून पूर्व जर्मनीचे एक प्रसिद्ध बालवाङ्मय–लेखक विली माईक हे नुकतेच भारत–भेटीला आले होते. ते दिल्लीला असताना म्हणाले, "अशा कथांचे पुस्तक जर्मन मुलांना आवडेल यात शंका नाही." कारण बारा वर्षांपूर्वी त्यांनी चीनला जाऊन चिनी कथांचा संग्रह तयार केला तो खूपच लोकप्रिय झाला होता. भारताचा इतिहास व भारताची संस्कृती इतकी समृद्ध आहे की, भारताची कुठलीही कथा नि:संशय अत्यंत वाचनीय ठरेल. पण माझा मुख्य उद्देश केवळ वाचनीय बालवाङ्मय लिहिणे हा नसून त्या वाङ्मयाच्या द्वारे जगात सौहार्दाची भावना वाढविणे हा आहे. आजची निरनिराळ्या देशांतील मुले उद्या जबाबदार नागरिक झाल्यावर एकमेकांशी मैत्रीने राहतील, असे जग हे त्यांचे ध्येय आहे. 'तुटलेला धागा' नावाच्या आपल्या नवीन पुस्तकात त्यांनी एका लहान मुलाची गोष्ट सांगितली आहे. एका मागासलेल्या देशातला हा मुलगा जेथे मुले सुखी असतील, अशा ठिकाणी जाणाऱ्या अनिवार इच्छेने व्यापला जाऊन त्याची कशी दुर्दशा होते याचे त्यांनी चित्र रंगविले आहे. हे पुस्तक लिहायला तीन वर्षे लागली. "इतर देशांतली मुले कुठल्या संकटांशी झटत आहेत, याची जर्मन मुलांना जाणीव करून देण्याचा हा माझा प्रयत्न आहे."

●

१९ जानेवारी १९६७ रोजी साऱ्या महाराष्ट्रावर खिन्नतेची गडद छाया पसरली. मोठा अपेक्षाभंग झाला होता. जी गोष्ट सारा महाराष्ट्र गृहीत धरून चालला होता त्याच्या नेमके उलट झाले होते. १६ जानेवारीपर्यंत गोमंतक महाराष्ट्रात येणार, याबद्दल कुणाला काडीचीही शंका नव्हती. गोवा वेगळा ठेवण्यासाठी जिवाचा आटापिटा करणाऱ्या युनायटेड गोअन्सनादेखील आपल्या विजयाची शंका नव्हती. मराठी वृत्तपत्रांनी तर आज गोमंतक महाराष्ट्रात येणार म्हणून स्वागताचे अग्रलेखही लिहून टाकले होते. आता फक्त विलीनीकरणाची मते किती आघाडी मारतात एवढेच बघायचे होते आणि एकाएकी सारे चित्र पालटले. तोंडात मारल्याप्रमाणे महाराष्ट्रवाद्यांना झाले. हिंदूंची बहुसंख्या असलेल्या, ९० टक्के लोकांची मातृभाषा मराठी असलेल्या गोव्याने महाराष्ट्रात येण्याचे नाकारले. अनपेक्षित धक्का बसला.

ही किमया कशी झाली ? मागील निवडणुकांमध्ये महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षान

# " गोवानीज आहोत, भारतीय नाही "

आघाडी मारली असता याच महत्त्वाच्या जनताकौलाच्या वेळीं विलीनीकरणवाद्यांचा पराभव कसा झाला ? सर्वांचेच अंदाज कसे कोसळले ?

पराभवाच्या धक्क्यातून सावरताच महाराष्ट्रामध्ये या अपयशाची कारणमीमांसा सुरू झाली. एकमेकांची उणीदुणी निघू लागली. महाराष्ट्र सरकारच्या 'समाजवादी' धोरणामुळे गोवेकर महाराष्ट्रात येण्यास घाबरतात, असे काही लोक सांगू लागले तर काही महाराष्ट्रीयांच्या गोव्यातील अतिरेकी प्रचारावर टीका करू लागले. महाराष्ट्राच्या विस्तारवादाची ही प्रतिक्रिया' असा आत्मटीकेचा शिक्का काहींनी उठवून टाकला.

## चर्चची गुलामगिरी

परंतु पणजीला एका प्रतिष्ठित गोमंतकीयाने मला जे सांगितले ते ऐकून मी जरा अस्वस्थ झालो. जनताकौलाचा निर्णय लागून ३–४ दिवस झाले असतील नसतील. रस्त्यांवरील आणि भितींवरील प्रचारघोषणा अद्याप साफ पुसल्या गेल्या नव्हत्या. विजेत्यांचा जल्लोष हळूहळू कमी होत होता. पराभूतांच्या चेहऱ्यांवरील सुतकी कळा मात्र अद्याप ओसरली नव्हती. झाले गेले ते गंगेला मिळाले, आता खरे बोलायला

'माणूस' प्रतिनिधीकडून

हरकत नाही, अशा विचाराने हा गृहस्थ मला म्हणाला, "खरे सांगतो. जनता-कौलाचा मूलभूत प्रश्न महाराष्ट्र की संघराज्य असा नव्हता. गोमंतकीय महाराष्ट्रात येण्यास नाखूष होते म्हणून असा निकाल लागला, असेही म्हणता येणार नाही. म्हैसूर की स्वतंत्र गोवा असा कौल लावला तरी तो स्वतंत्र गोव्याच्याच बाजूने पडेल. आणि भारत की गोवा, असा प्रश्न आला तरीही अल्पसंख्याकांचा कौल गोव्याच्याच बाजूने पडेल."

या गृहस्थांच्या सांगण्यात खूपच तथ्य असावे. कितीतरी गोमंतकीयांनी गंभीरपणे मला हेच सांगितले. पुन:पुन्हा सांगितले. आणि जनताकौल घेण्याचा निर्णयच कसा चुकीचा होता, हे सांगितले.

गोमंतकाबद्दल ही भीती का व्यक्त केली जाते याला कारणे आहेत. गेली साडे-चारशे वर्षे गोमंतकीय जनता, विशेषत: कॅथॉलिक जनता, जगाच्या सगळ्या घडा-

# स्वतंत्र गोव्याची कथा आणि व्यथा

मोडींपासून अलिप्त राहिली होती. तिला मुद्दाम दूर ठेवले गेले होते. जगातल्या इतर गोष्टींचा तिला स्पर्श झाला नाही. वर्तमानपत्रांपासून ती लांब होती. त्यामुळे स्वातंत्र्याच्या कल्पनेची तिला जाणीवही झाली नव्हती. पोर्तुगीज हे काही इंग्रज नव्हते. त्यामुळे इंग्रजी ज्ञानाचे वाघिणीचे दूध पिऊन इतर भारतीय जसे स्वातंत्र्या-भिमुख झाले तसे गोमंतकीयांचे झाले नाही. त्यामुळे स्वातंत्र्य म्हणजे काय? त्यापासून हित कोणते? लोकशाही म्हणजे काय? आपण भारतीय आहोत म्हणजे कोण आहोत, याची शिकवण त्यांना मिळाली नाही. त्यामुळे त्यांनाही नव्या परि-वर्तनाची जाणीव झाली नाही.

शिवाय गोमंतकीय कॅथॉलिक जनतेवर सतत चर्चचा वरचष्मा राहिला आहे. गोमंतकातील कॅथॉलिक ख्रिश्चन अतिशय भाविक आणि धर्मभीरू. चर्चवर त्यांची फार मोठी निष्ठा. चर्च जे सांगेल तेच ते प्रमाण मानतात. तेच त्यांचे ब्रह्मवाक्य. भारतात इतर कुठेही नाही एवढा चर्चचा जबरदस्त पगडा गोव्यातील कॅथॉलिकांवर आहे. भारतातील इतर चर्चेसचे नियंत्रण रोममधून होते; परंतु गोव्यातील सर्व चर्चेसचे व्यवहार मात्र पोर्तुगालमार्फत चालतात हे सर्वांनाच ठाऊक आहे. गोव्यात

ख्रिश्चनांमार्फत कोणतीही गोष्ट करवून घ्यायची असली तर सर्वांत सोपा उपाय म्हणजे चर्चची कास धरणे. त्यामुळे कोणत्याही राजकीय पक्षाने एखादी गोष्ट कितीही पटवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तरी कॅथॉलिकांवर त्याचा परिणाम होत नाही. चर्च जे सांगेल ते मात्र सारे कॅथॉलिक मुकाट्याने पाळतात. चर्च सांगेल तिथेच मतेही टाकतात.

समुद्रमार्गाने गोव्यात आल्यानंतर पोर्तुगीजांनी राज्यप्रसाराला आणि धर्मप्रसाराला एकदमच सुरुवात केली. त्यांचा धर्मप्रचार आणि राज्यप्रसार रोखला तो देसाई आणि राणे या मराठ्यांनी समुद्राच्या बाजूनेदेखील पोर्तुगीजांना रोखले मराठ्यांनीच. त्यामुळे पोर्तुगीजांना आणि पोर्तुगीज मिशनऱ्यांना मराठ्यांविषयी आणि महाराष्ट्राविषयी पूर्वीपासूनच अढी आहे, द्वेष आहे. ही द्वेषभावना गोव्यातील कॅथॉलिक चर्चेसनी पद्धतशीरपणे गोमंतकीय कॅथॉलिकांत भिनवली. बुद्धिपुरस्सर हे विष या लोकांच्या मनात साडेचारशे वर्षे भिनवले गेले आणि आजही भिनवले जात आहे.

## लष्करी कारवाईची निकड

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तर एकूणच भारताविषयीच्या अपप्रचाराला गोव्यात ऊत आला होता. एकं ना एक दिवस गोमंतकही आपल्या हातून जाणार हे पोर्तुगीजांना माहीत होते. पण कसेही करून गोवा टिकवायचाच हा पोर्तुगीज चर्चचा प्रयत्न होता. धर्मप्रसाराला भारतीय खंडावर कोठेतरी पाऊल ठेवायला जागा हवी होती, आणि गोव्याची भूमी त्यांना गमवायची नव्हती. त्यासाठी त्यांनी चर्चमार्फत अनेक योजनाही आखण्यास सुरुवात केली होती. रोम शहरात जसे व्हॅटीकन हे ख्रिश्चन धर्माचे स्वतंत्र सार्वभौम पीठ आहे, तसेच आशियातील धर्मप्रसाराची सूत्रे हालविण्यासाठी गोवाही ख्रिस्तीधर्माचे सार्वभौम पीठ करावे, अशी एक योजना होती व ती अंमलात आणण्यासाठी दक्षिण अमेरिकेत ब्राझीलमध्ये १९५४ साली एक संघटनाही स्थापन करण्यात आली होती. युरोपमध्ये अनेक लहान लहान राष्ट्रे आहेत. ती जर स्वतंत्र राहू शकतात तर गोवा का राहू नये, असा त्यांचा दृष्टिकोन होता. आणि ही विचारसरणी चर्चमार्फत सर्व गोमंतकीयांत प्रसृत केली जात होती. अजूनही गोमंतकीय ख्रिश्चनाच्या मनातून ख्रिश्चन धर्मपीठाचे ते स्वप्न गेले नसले पाहिजे.

हे प्रयत्न चालू असतानाच गोव्याचे बंदर आंतरराष्ट्रीय बंदर म्हणून स्वतंत्र बंदर ठेवण्याच्या योजनाही घाटल्या जात होत्या. त्याबाबतीत पोर्तुगालने अमेरिकेशी आणि पाकिस्तानशी बोलणीही सुरू केली होती. काही माहितगारांच्या म्हणण्याप्रमाणे पंडित नेहरूंना या योजनेची कुणकुण लागली होती. म्हणूनच गोव्याच्या मुक्तीसाठी लष्कर वापरणार नाही असे त्यांनी वारंवार जाहीर केले असतानाही ही योजना हाणून पाडण्यासाठी म्हणून त्यांना शेवटी लष्करी कारवाईनेच १९६२

साली गोवा मुक्त करावा लागला.

पोर्तुगाल आणि इतर पाश्चात्य राष्ट्रांना ही लष्करी कारवाई आवडली नाही याला कारण आशियाई धर्मपीठाचे त्यांचे स्वप्न मावळले. गोमंतकीय कॅथॉलिक चर्चेसनाही ही मुक्ती आवडली नाही याचेही कारण तेच.

" आजही गोमंतकातील अनेक कडवे ख्रिश्चन गोमंतक पोर्तुगालच्या दास्यातून मुक्त होऊन भारतात आला याचे दु:ख करतात. " असे दुसऱ्या एका गोमंतकीयाने मला सांगितले. आणि खरे आहे. " आम्ही गोवानीज आहोत, भारतीय नाही, " असे म्हणणाऱ्यांची गोव्यात कमतरता नाही. गोव्यातील एक कॅथॉलिक मिशनरी फादर मींतेरा यांच्यावर याच कारणासाठी पणजीमध्ये एक खटला चालू आहे, मींतेरा म्हणतो, " मी गोवा स्वतंत्र झाला असे मानीतच नाही. "

हीच गोमंतकाची आज शोकांतिका आहे. पोर्तुगीजांच्या बंधनातून मुक्त झालेला गोमंतक मानसिक गुलामगिरीच्या शृंखलांतून अद्याप बाहेर पडलेला नाही. गोव्याची संस्कृती वेगळी आहे, असे पंडित नेहरू जे नेहमी म्हणत त्यांना हाच वेगळेपणा अभिप्रेत होता की काय, कुणास ठाऊक ! परंतु गोव्यातल्याच एका ज्येष्ठ महाराष्ट्र-वादी कार्यकर्त्याने मला सांगितले, " साडेचारशे वर्षांच्या पोर्तुगीजांच्या प्रचाराचा आमच्या डोक्यावर इतका जबरदस्त परिणाम झालेला आहे की मुक्तीनंतरही आमची गुलामी मनोवृत्ती गेलेली नाही. "

## गोमंतकाची ही मूलभूत समस्या आहे.

स्वतंत्र सार्वभौम नाहीतर नाही. निदान इतर भारतापासून तरी गोवा अलिप्त राहावा व अशा अलिप्त गोव्यावर आपले वर्चस्व राहावे, ही पोर्तुगीज चर्चची ईर्ष्या अद्याप गेली नाही. त्यामुळेच गोव्यातील कोणत्याही निवडणुकीत चर्च मोठ्या हिरीरीने भाग घेते, प्रचार करते आणि मोठ्या प्रमाणात पैसा ओतते. मागच्या निवडणुकीत महाराष्ट्रवादी गोमंतकपक्षास पाडण्यासाठी चर्चने पैसा ओतला होताच. याही जनताकौलामध्ये चर्चने बेहिशेब पैसा सोडला. या वेळेस विलीनीकरणवादी म्हणत होते की, बरेच ख्रिश्चनही आमच्या बाजूने मते देतील. परंतु ख्रिश्चन विलीनीकरणाच्याही बाजूचे नव्हते आणि संघराज्याच्याही बाजूचे नव्हते. ते फक्त चर्चच्या बाजूचे होते. जनमतकौलामध्ये एकही ख्रिश्चन मत विलीनीकरणाच्या बाजूने गेले नाही, हे उघड आहे. सर्व वृत्तपत्रांनी आणि निरीक्षकांनी हे मान्य केले आहे. चर्चचा प्रचार विलीनीकरणाच्याविरुद्ध होता. त्यामुळे एकाही ख्रिश्चनाची विलीनीकरणाला मत द्यायची बिशाद नव्हती.

तसे पाहता गोव्यात ख्रिश्चनांची अल्पसंख्या आहे. असे असूनही संघराज्याला अधिक मते पडली, याचा अर्थ बऱ्याच हिंदूंनी संघराज्याच्या बाजूने आपला कौल दिला आहे. हिंदूंची मते संघराज्याकडे गेली याला अनेक कारणे आहेत. मुख्य कारण म्हणजे पैसा. चर्चमार्फत गोळा केलेला अमाप पैसा युनायटेड गोअन्सनो

जनताकौलात खर्च केला, असे बोलले जाते. गोमंतकातील खालच्या वर्गातील हिंदू ग्रामीण जनता अतिशय दरिद्री आणि अशिक्षित आहे. थोडासा मोह दाखवून तिला कुणालाही आपल्या बाजूने वळवून घेणे शक्य आहे. बराच मोठा दरिद्रीवर्ग या मोहाला बळी पडला. खालच्या वर्गातील ख्रिश्चनांमध्येसुद्धा चर्चमार्फत बरीच खिरापत वाटण्यात आली.काही लोक तर सांगतात,की संघराज्याकडे मते देणाऱ्यांना एकेक वर्षाचे पीठ देऊ, अशी आश्वासने देण्यात आली होती. हे पीठ अमेरिकन रेसक्रॉसकडून येणार असल्याचेही सांगण्यात आले. टंचाईने आणि महागाईने त्रासलेल्या गरीब लोकांना हे खूपच मोठे आमिष होते.

जनताकौलामध्ये काही संबंध नसताना म्हैसूर सरकारने अव्यापारेषु व्यापार केला त्याचीही दखल घेतली पाहिजे. म्हैसूर सरकारने कित्येक लाख रुपये या कौलासाठी खर्च केले, असे गोव्यात बोलले जाते. जनताकौलामध्ये म्हैसूर सरकारने उघड उघड भूमिका वठविली नसली तरी महाराष्ट्राचे नाक कापण्याची आलेली सुवर्ण संधी दवडू नये म्हणून अनेक पडद्याआडच्या हालचाली केल्या. मुंबईतूनही जनताकौलासाठी युनायटेड गोअन्सच्या बाजूने पैसा आला. या कौलात एकूण खर्च झालेल्या पैशाचे दरडोई प्रमाण काढले तर ते भारतात झालेल्या कोणत्याही निवडणुकीपेक्षा जास्त ठरेल. विलीनीकरणवाद्यांच्या बाजूने मात्र पैसा खर्च करायला कुणी तयारच नव्हते. सारी जबाबदारी पडली होती एकटया बांदोडकरांवर.

विलीनीकरणवाद्यांच्या आततायी जातीय प्रचारामुळे बरीच मते फिरली, असा आरोप केला जातो. या आरोपात काही तथ्य नाही, असे श्री. बांदोडकर यांच्यासकट बऱ्याच गोमंतकीयांचे म्हणणे आहे. संघराज्याचा प्रचार अधिक जातीय होता. हे सिद्ध करून दाखवायला पुरावेच नकोत. चर्चेसमधूनच त्यांचा प्रचार होत होता. मग महाराष्ट्रवाद्यांच्या 'आततायी' प्रचारामुळे कुणाची मते बिथरणे शक्य होते? त्या ख्रिश्चनांची मते बिथरणे शक्य होते त्यांची मते आधीच ठरलेली होती."प्रचार थोडा अतिरेकी झाला खरा," असे काहीजण कबूल करतात. पण सारा दोष प्रचारावर ठेवायला कुणीही तयार नाही.

**युनायटेड गोअन्सनी जनता कौल आपल्या बाजूने होण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला. मुंबईच्या सुमारे २५ हज़ार गोमंतकीय ख्रिश्चनांची नावे या कौलासाठी अनेक लटपटी खटपटी करून नोंदविली गेली. मुंबईच्या निवडणूक यादीत नावे असलेल्या २०–२५ वर्षे मुंबईत राहिलेल्या माणसांचीही नावे या यादीत नोंदवून घेण्यात आली. आणि तीही विशेष गाजावजा न करता. दिनांक १४ जानेवारीला ही यादी प्रसिद्ध झाली. कुणी आक्षेप घ्यावा म्हटले तर १५ तारखेला रविवार**

**आणि १६ तारखेला मतदान! "शासकीय यंत्रणा सर्वस्वी संघराज्यवाद्यांच्या बाजूने कशी राबली, याचे हे चांगले उदाहरण आहे." एका कार्यकर्त्याने सांगितले.**

विलीनीकरणवाद्यांच्या आणखीही काही गंभीर तक्रारी आहेत. ख्रिश्चनांची कमी वयाची मुले मुली यांच्यामध्ये नोंदविली गेली तर हिंदूंची गावेच्या गावे काही याद्यांमध्ये नाहीत. इंग्रजी याद्या आणि मराठी याद्या यांच्यामध्ये फरक आहे. हिंदू वाड्यांमधील मतदारांसाठी मतदानकेंद्रे मुद्दाम लांब लांबच्या वाड्यांवर ठेवण्यात आली.

सर्वांत गंभीर तक्रार म्हणजे ख्रिश्चन बहुसंख्या असलेल्या वस्त्यांमध्ये ख्रिश्चनांच्या दहशतीमुळे हजारो हिंदूंनी मतदानच केले नाही. काही जण अशा घाबरून मतदान न केलेल्या हिंदू मतदारांची संख्या तर पन्नास हजारांपर्यंत आहे, असे सांगतात. एका कार्यकर्त्याने सांगितले की, ज्या बूथवर दहशतीमुळे हिंदू मतदानाला आले नाहीत अशाच ठिकाणी ९० टक्क्यांच्यावर मतदान झालेले आढळून आले आहे. बोगस मतदान झाल्याचे हे उघड लक्षण आहे. दुसऱ्या एकाने सांगितले, "पोलिंग ऑफिसर बहुतेक ख्रिश्चन होते. ते सरळ सांगायचे, पानावर शिक्का मारा. आम्ही लेखी तक्रारी केल्या. पण त्या फेटाळण्यात आल्या."

विलीनीकरणाचा प्रचार करण्यासाठी मुंबई प्रदेश काँग्रेसतर्फे मुद्दाम काही प्रचारक आले होते. त्यातली काही माणसे चक्क फितूर निघाल्याची विलीनीकरणवाद्यांची तक्रार आहे. गोवा महाराष्ट्रात गेल्यास त्याचा फायदा महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांना मिळेल आणि त्यांची प्रतिष्ठा वाढेल, असे मुंबई काँग्रेसला वाटत होते. ते त्यांना नको होते. म्हणून विलीनीकरण आघाडीत फूट पाडण्यासाठी त्यांनी सरळ फितुरी केली. विशेषत: श्री. स. का. पाटील यांची युनायटेड गोअन्सचे नेते जॅक सिक्वेरा यांच्याशी घनिष्ठ मैत्री असताना, त्यांनाच मुंबई काँग्रेस विलीनीकरणाच्या बाजूने प्रचार करणार हे असंभवनीय वाटायला हवे होते; परंतु हा धोका वेळीच ओळखला गेला नाही.

शिवाय जनताकौलामध्ये जेवढ्या प्रमाणात म्हैसूर सरकारने भाग घेतला तेवढ्या उत्कटतेने महाराष्ट्र सरकारने आणि महाराष्ट्रीय नेत्यांनी भाग घेतला नाही, अशी जेष्ठ महाराष्ट्रवादी गोमंतकीयांची तक्रार आहे. विलीनीकरणवाद्यांच्या प्रचाराची सारी धुरा एकट्या बांदोडकरांनी आपल्या शिरावर घेतली होती. जणू ती त्यांची एकट्याची जबाबदारी होती. महाराष्ट्राकडून त्यांना विशेष साथ मिळाली नाही. आता यापुढेही जर महाराष्ट्राने आणि महाराष्ट्रीयन नेत्यांनी गोव्याच्या निवडणुकीच्या बाबतीत उदासीन वृत्ती दाखविली तर त्याचे परिणाम आणखीनच वाईट होतील आणि हा प्रश्न अधिकच चिघळत पडेल असा इशारा गोमंतकीय नेते देतात.

## परकीय भांडवलाचे वर्चस्व

गोवा महाराष्ट्रापासून वेगळा आणि स्वतंत्र ठेवण्यामागे व्यापाऱ्यांचा आणि

भांडवलदारांचाही स्वार्थ आहे. युनायटेड गोअन्स पक्षाचे नेते श्री. जॅक सिक्वेरा हे एका मोठ्या अमेरिकन कंपनीच्या सहकार्याने गोव्यात एक मोठा धंदा उभारणार असून त्यांना श्री. स. का. पाटील यांचा पूर्ण पाठिंबा असल्याची गोव्यात दाट बोलवा आहे. गोवा वेगळा राहण्यात असेच वेगवेगळ्या लोकांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा हिंदूंनीही संघराज्याच्या बाजूने मते टाकली असली पाहिजेत.

जनताकौलानंतर गोमंतकात काही ठिकाणी जे अपप्रकार घडले ते चिंतनीय आणि हिंदूंचा स्वाभिमान डिवचणारे आहेत. युनायटेड गोअन्सच्या लोकांनी विजयाच्या बेभान धुंदीत ज्या काही गोष्टी केल्या त्यांतल्या काही अशा सांगितल्या जातात— ख्रिश्चन बहुसंख्य असलेल्या वस्त्यांमध्ये हिंदू घरांतील तुळशीवृंदावने फोडले, मोटारी-तून, ट्रकमधून जात असताना हिंदू स्त्रियांच्या केसातील फुले उडविणे, स्त्रियांना शिव्या देणे, आमच्या गावात धोतर नेसू नका, टोपी घालू नका अशा धमक्या हिंदूंना देणे. या बातम्या जर खऱ्या असल्या तर निश्चितच चिंतनीय आहेत. "हाती सत्ता नसताना जर हे लोक असे वागतात तर ते सत्ताधिष्ठित झाल्यावर काय होईल? हिंदूंना अब्रूने जीवन जगणे मुश्कील होऊन जाईल," असे वैतागाचे उद्‌गार एका हिंदू गोमंतकीयाने माझ्यापाशी बोलताना काढले.

संघराज्यात राहण्याचा कौल गोमंतकानं सध्या तरी दिला आहे खरा; पण लवकरच हिंदूंना आपल्या चुका कळून येतील. अजूनही महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला गोव्यातील येत्या निवडणुका जिंकण्याचा विश्वास वाटतो. म्हणून गोमंतकाने केवळ संघराज्यात राहण्याचा कौल दिला म्हणून युनायटेड गोअन्सना स्वस्थता नाही. केवळ धर्माच्या जोरावर आपण कौल जिंकला आहे हे त्यांना माहीत आहे. आणि गोव्यात हिंदूंची बहुसंख्या आहे. त्यामुळे सत्तेवर येण्याइतपत बहुमत आपणाला मिळेल की नाही, याची त्यांना शंका आहे. त्यामुळे ख्रिश्चन बहुसंख्या असलेले राज्य त्यांना हवे आहे. त्यासाठी जुआरी नदीची रेषा धरून गोव्याची फाळणी करण्याचीही स्वप्ने ते बघत आहेत. उरलेला हिंदू बहुसंख्याक भाग वेगळा व्हावा आणि ख्रिश्चन बहुसंख्या असलेले राज्य स्वतंत्र राहावे अशी एक योजना असल्याचे गोव्यात बोलले जाते. गोवा एकसंध राखण्याची महाराष्ट्रवादी गोमंतकाची भूमिका आहे. म्हणून येती निवडणूक महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष पुन्हा हिरीरीने लढवीत आहे.

गोमंतकातील जनताकौलाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर येती निवडणूक लढविली जाणार आहे. आपल्या हाती असलेल्या सर्व शक्तींचा वापर करून युनायटेड गोअन्स ही निवडणूक जिंकल्याचा प्रयत्न करतील. महाराष्ट्रवादी शक्तींनीही एकमेकांची टिंगल उडवीत आणि उणीदुणी काढीत बसण्याऐवजी एकवटून हुशारीने गोमंतकातील महाराष्ट्रवाद्यांच्या पाठीशी उभे राहण्यात याही वेळी कुचराई केली तर तो एक महान ऐतिहासिक प्रमाद ठरल्याशिवाय राहणार नाही. ●

# तुमच्या लाडक्या लेकीच्या लग्नाला आम्ही रु. ३०००/- देऊं ..

Pratibha-M/855/A

तुम्ही विम्याची पॉलिसी घेतली की ठरविलेल्या रकमेची निश्चिती होते. एकदम रक्कम उभी करण्याऐवजी विम्यामध्यें लहान लहान हप्ते सोयीस्कर रीतीने भरता येतात. दुर्दैवाने आधीच वडिलांचा मृत्यु झाल्यास ठरलेल्यावेळी ठरलेली रक्कम पुढील हप्ते न भरता मिळते. हे फक्त विम्यानेच होऊ शकते. विमा उतरविणे किती सोपे व थोडक्यांत आहे ते पहा. उदा. तुमचे वय ३० असेल आणि लेकीचे २ असेल तर तिच्या लग्नाचें वेळी म्हणजे तिच्या २० व्या वर्षी ३००० रुपये हवे असतील तर दरमहा १२ रुपये विम्याचा हप्ता पडतो. तुमच्या विमाएजंटाचा आजच सल्ला घ्या.

**आयुर्विम्याला** पर्याय नाहीं



माणूस प्रतिष्ठान

मुक्काम सुपे



एक पत्रकार

# माती आणि

सायकलचे पेडल्स मारमारून थकलो होतो. रस्त्यावरचे चढ चढून जाताना तर नकोसं होत होतं. मधूनच डाव्या बाजूनं येणारा वारा नाकातोंडात धूळ मारून बेजार करून टाकीत होता. जीव कसनुसा झाला होता. शेणटोपली डोक्यावर घेऊन जाणाऱ्या एका चिमुरड्या शेंबडीला शेवटी न राहवून विचारलं, "सुपं किती दूर आहे अजून ?"

"ह्ये काय. त्या माळापल्याड घरं दिसतात नव्हं का ?"

ज्या वस्तूंकडे तिनं घरं म्हणून बोट दाखविलं त्या मला केव्हापासूनच उंचवट्या-वरून दिसत होत्या. दगडावर दगड रचून ठेवलेले दिसत होते. या भागात फारसं कधी आलो नसल्यानं ती घरं असतील, याची कल्पना नव्हती. असेल एखादं उजाड, पडकं गाव अशी शंका चाटून गेली होती खरी; पण त्या मुलीनं सांगितलं तेव्हा मात्र चाट पडलो. थोडं पुढे गेलो, तेव्हा खात्री पटली. जवळच त्या घरापलीकडे एक नवी छोटी सरकारी इमारत दिसत होती. आणि आणखी पलीकडे झाडामधून थोडी बऱ्यापैकी म्हणता येतील अशी घरं दिसत होती. आणि दळणाच्या गिरण्यांचा टुक-टुक-टुक असा आवाज कानांवर येऊ लागला होता.

शेवटी गाव आलं म्हणून जरा हायसं वाटलं. सायकल उभी केली आणि हुश्श करून तोंडावरची धूळ पुसत जवळच्या एका दगडावर बसलो. पुन्हा तीच पडकी वाटणारी, ओसाड दिसणारी घरं नजरेत भरली. वाऱ्याने उडणाऱ्या धुळीत ती



# माणूस

अधिकच कंगाल दिसत होती आणि उगाचच खिन्न वाटत होतं. एकदम विचार आला 'माणूस प्रतिष्ठान'ने आपल्या प्रयोगासाठी जागा मात्र एकदम योग्य निवडली आहे.

आता आत गेल्यावर माजगावकरांना गाठायचं होतं. खेडेगावात असं काम सोपं. म्हणून आत शिरल्यावर पहिल्याच दिसणाऱ्या पाव्हण्यांना विचारलं, "माजगावकर कुठे सापडतील ?" पाव्हण्यांनी माझ्याकडे कुतुहलाने निरखून पाहिलं अन् म्हणाले, "कोण माजगावकर ?" घ्या. आता आली का पंचाईत ! म्हणजे 'माणूस प्रतिष्ठान'चं काम गावात चालू आहे आणि या लोकांना पत्ताही नाही. आणि मग हे कसलं सामाजिक काम. लोकांच्या दूर राहून का असली कामं होत असतात ? आपल्या लेखात या गोष्टीवर सडकून टीका करायचं मनातल्या मनात ठरवून टाकलं. मग एक युक्ती सुचून चटकन पाव्हण्यांना विचारलं– "ते विहीर खोदणारे पुण्याचे हो." "असं व्हय, मग तसं सांगाकी. त्ये तिकडं पूल बांधतायत नाल्यावर."

अरेच्चा हा कसला नवा उपद्व्याप सुरू केलाय माजगावकरांनी ! अधिक अन्नोत्पादनासाठी विहिरी वगैरे खोदायच्या सोडून पुलाची कंत्राटं घ्यायला यांनी केव्हापासून सुरुवात केली ? प्रत्यक्ष कामाच्या जागी पोचलो तेव्हा हसूच आलं. एका बारीक ओहोळावर फूटभर रुंदीची आणि चार-पाच फूट लांबीची पायवाट दगड गोळा करून काही मुलं बांधीत होती. माझ्या चेहऱ्यावरचं हसू पाहताच माजगावकर म्हणाले, "आठवडाभर आमच्या मुलांनी गावाबाहेर काम केलं. गावा-

साठीही एखादी ' श्रमभेट ' जाता जाता तयार करावी ही कल्पना. एखादा उकिरडा स्वच्छ करण्याचीही आमची तयारी होती. शेवटी ही पायवाट ठरली. आमच्या मनाचं समाधान एवढंच याचं महत्त्व."

एकतर शहरातली मुलं खेड्यांत श्रमदानासाठी जाऊन खरोखरच ' कामं ' करतात किंवा काय याविषयीच मला जबरदस्त संशय होता. ही शंका घ्यायला स्वत: केलेल्या ' श्रमदाना'चा अनुभवही पाठीशी होता. पण तेव्हा काही बोललो नाही. मुक्कामावर सामान टाकून हातपाय धुऊन जरा फेरफटका मारायला बाहेर पडलो. काँग्रेसच्या एका प्रतिष्ठित पुढाऱ्यांना विचारलं, " काय कसं काय म्हणतंय ' माणूस प्रतिष्ठान'चं काम ?"

" हां ठीक आहे. आता इलेक्शन जवळ आहे. इलेक्शन झाल्यावर बघावं. "

" आँ? म्हणजे माजगावकर इथून उभे राहणार आहेत की काय ! अरे व्वा!"

## दर्यामें खसखस

" नाही. तसं नाही म्हणत मी. पण असे कोण फुकाफुकी आमच्या गावाकडं लक्ष देतोय! इथून तिथून सारा दुष्काळी भाग. काय मिळनार लक्ष देऊन ?"

" मग तुम्ही तुमच्या पक्षामार्फत वगैरे काही प्रयत्न करीत नाही ?"

" त्याचं आसं आहे, आमच्याकडचा कोणी आमदार नाही. त्यामुळे सरकार इकडं ढुंकनही बघत नाही. गाव आहे गरीब. इलेक्शनला खर्च करण्याइतका कुणाजवळ पैसा नाही. म्हणून कुणाला तिकीटही मिळत नाही. एकूण गाव राहतो कोरडाच !"

आणि सुपं खरोखरच कोरडं ठणठणीत आहे. वर्षाकाठी अवघा १४–१५ इंचांचा पाऊस. मुठेचा कालवा जातो ८–१० मैलांवरून. पलीकडे कऱ्हा नदीही अशीच दुरून वाहते. त्याचं पाणी झिरपून सुप्याला येणं शक्य नाही. कारण, मध्ये आहेत टेकड्या. हा सारा पट्टाच दुष्काळी आहे."

" दुस्काळ आमच्या सवईचा आहे बघा. " गुलाबराव कोंडे नावाच्या एका सुपेकरांनी सांगितलं. " तीन वर्षांतून दोन वर्षं तर अशी जातात की जमिनीचा दाणा महिनाभरसुद्धा पुरत नाही. "

" मग तुम्ही भागवता कसं ? जगता कसे ?"

" जगतो न् काय. सगळे बापेलोक शहरांत जातात. काय मिळेल तो कामधंदा-हमाली करतात. आन् पावसाच्या सुमाराला परत येतात. पुन्हा पिकानं दगा दिला का पुन्हा जातात. आम्ही म्हातारे कोतारे थांबतो गाव राखायला. "

ऐकून मी थक्क झालो. विचारलं, "तुम्ही लोक मग विहिरी का खणत नाहीत ?" "खात्रीचं पाणी असलं की पिकाची खात्री असते. " जवळ उभे असलेले म्हातारबुवा माझ्याकडे पाहून नुसतेच हसले. मग ध्यानात आलं, विहीर खणायला एक तर पसा

हवा. आणि विहिरीला पुन्हा पाणी लागायला हवं. दोन्ही गोष्टी सुप्यासारख्या वैराण दुष्काळी भागात कशा जुळून येणार ?

थोड्या वेळाने 'माणूस प्रतिष्ठान'ची विहीर पाहायला गेलो. दीड मैलभर उन्हात पुन्हा सायकल हाणीत न्यावी लागली. महिनाभर या मार्गानं सायकल नेली तर कुठल्याही सर्कशीत काम मिळेल असं आपलं उगाच वाटलं. प्रत्यक्ष विहीर पाहिली तेव्हा एकदम बरं वाटलं. माजगावकर 'माणूस प्रतिष्ठान' साठी कुदळी-फावडी घेऊन सुप्याला अधून मधून जातात असं माहीत होतं. गेला आठवडाभर 'यूथ ऑर्गनायझेशन'ची सात-आठ पोरंही तिथं श्रमदान करताहेत असंही ऐकलं होतं. पण गंभीरपणे खरोखरच एवढं काम झालं असेल, अशी कल्पना नव्हती. चारी बाजूंना माळरानासारख्या पसरलेल्या त्या शेतात एका उंचवट्यावर चांगली पंधरा फूट खोल आणि २५ फूट व्यासाची विहीर खणून झाली होती. विहिरीपासून ज्या शेतांना पाणी मिळणार आहे त्यांचे मालक आणि इतर काही मजूर कामं करीत होते. श्रमदानासाठी आलेल्या मुलांनी शेवटचा दिवस म्हणून सुट्टया घेतल्या होत्या. (आठवडाभर बहुधा त्यांनी मस्त सुटी घालवलीच असली पाहिजे) परंतु त्या मुलांच्या काम करणाऱ्या मजुरांशी चांगल्याच घरोब्याच्या ओळखी दिसल्या. "काय तात्याबा कुठवर आलंय आज ?" "उतरा की. आज माल काढायचा नाही वाटते?" अशा वाक्यांची त्यांच्यांत देवाण-घेवाण झाली. पोरं बहुधा रोज येऊन विहिरीवर बसत असावीत– मी विचार केला.

सुरुंग लावण्याचं काम चालू होतं. सुरुंग भरल्यावर आम्ही प्रथम दूर जाऊन उभे राहिलो. कुणीतरी वात पेटवली. आणि "पेटलं होऽऽ" अशी आरोळी ठोकीत धूर बाहेर पडत असताना कामकरी विहिरीबाहेर आले आणि धूम पळत सुटले. पाठोपाठ मोठा धडाका झाला. दगडांचे प्रचंड तुकडे वर उडाले आणि इतस्ततः विखुरले. काही वेळाने आम्ही जवळ जाऊन पाहिलं. तळाच्या खडकाला तडे गेले होते.

दुपारी पुण्याहून आणखी काही मंडळी आली. अंकामागे पैसा पैसा बाजूला टाकून उभं केलेलं काम कसं काय चालू आहे, हे बघायला सारे आले होते. दुपारी पुन्हा एकदा विहिरीवर वरात गेली. पुन्हा एकदा सुरुंग वाजले. संध्याकाळी गाव पाहिलं. म्हणजे सगळी पडकी घरे पाहिली. छत्रपतींचा पडका वाडा पाहिला. संध्याकाळच्या सावल्या लांबत होत्या. आणि पडक्या घरांचं ते गाव अधिकच भकास दिसत होतं. आमच्या अंगावर शहरी कपडे सोडले तर बाकी मध्ययुगीन काळात गेल्यासारखं वाटत होतं. बसकी पडकी घरं त्यातून वर येणारे धुराचे लोंढे. अर्धीनागडी खेळणारी पोरे. कुठे कुठे म्हणून विज्ञाननिष्ठ संस्कृतीचा, समृद्धीचा मागमूस दिसत नव्हता. काही वेळानं तांबडं झालेलं आकाश अधिकच काळवंडू लागलं. मिट्ट काळोख पडला आणि अधिकच

उदास वाटू लागलं. वाटलं, हे एक सुपं अशी किती तरी दुष्काळी गावं या जिल्ह्यात प्रांतात देशात तडफडत पडली असणार. ' माणूस प्रतिष्ठान ' एक विहीर खणणार पंचवीस एकर भिजतील फारतर. दहा विहिरी खणेल. सुपं भिजेल. सुपं भरेल. पण पुढे ? आणखी कितीतरी गावं आहेत. एका कोपऱ्यात विहिरी खणून देशाचा पाण्याचा आणि अन्नाचा प्रश्न सुटतो आहे की काय ! सगळीकडे अशा विहिरी खणण्याची, अधिक पाणी मिळविण्याची, अधिक अन्न पिकवण्याची चुरस लागली पाहिजे. त्याशिवाय काय ! पण कुणीतरी सुरुवात केली पाहिजे ना ! ' माणूस प्रतिष्ठान ' करते आहे हेच पुष्कळ आहे.

## श्रमसमाधी

दुसरे दिवशी सकाळी उठून पुन्हा सगळी मंडळी विहिरीवर. कालचा माल आज वर काढायचा होता. माल म्हणजे सुरुंगात फुटलेले दगड. कामकऱ्यांनी तो गोळा करून ठेवला होता. तो वर आणायचा. आठ दिवस काम करून तयार झालेली पेठे, कुलकर्णी, फडके, चौथाई आदी मंडळी जय्यत तयारीने ओळीत उभी राहिली. हळू हळू पाहुण्यांपैकी बायामंडळीही पदर खोचून लायनीत शिरली. मग आम्हांलाही लाजेकाजेस्तव उभे राहावे लागले. खालून दगडांनी भरलेली घमेली वर येऊ लागली आणि ओळीतून सरकून पलीकडच्या ढिगाऱ्यात पडू लागली. सुरुवातीला घमेली हळू हळू येत होती.

मग गती वाढू लागली. लय येऊ लागली. गोल गोल फिरत घमेली टोकापर्यंत वेगाने सरकू लागली. हुंकार घुमू लागले. 'हां–घ्या–सोडा–जपून–सांभाळा–लागेल हळू हळू फेका–टाका–अरे, रिकामं घमेलं ? मग टाकाना लवकर जरा–लागेल '– आवाज वाढू लागले. वेग वाढू लागला. सफाई येऊ लागली, घाम फुटू लागला. श्वासोच्छ्वास वेगाने होऊ लागले. काही वेळ शांतता. नुसताच घमेल्यांचा आणि दगडांचा आवाज मग दमलेल्या स्वरात शब्द फुटू लागले " अगं–अगं जरा जपून दमलीस किती तू ? " – " छे–छे मी कुठे दमलेय तुझाच चेहरा सुकला–" "काहो अजून किती उरलंय ?" "का दमलात वाटते ?" "हॅं: हॅं: मी कुठला दमतोय ?" " अरे थकला असशील तर बाजूला बस बरं का." "कोण मी ? आणि इतक्यात ? "

आता मंडळींचे तोल जाऊ लागले, डोळ्यात घाम शिरू लागला. घमेली अर्ध्यातच उपडी होऊ लागली. " जरा कमी भरा..फार जड होतायत " म्हणून तक्रारींचे स्वर ऐकू येऊ लागले. " खरंच किती उरलं आहे हो अजून ?" "संपत आलं बरं का मंडळी ! आता फक्त शंभर घमेली " " बाप रे ! " " मोजतय कोण ?" " अहो, शंभर तर केव्हाच होऊन गेली "–" बस–बस आता दहाच मिनिटं. की संपलं–" ,' घड्याळाला किल्ली दिली होती ना ?"–" संपलं–संपलं बरं का झकास–"

साऱ्यांनी श्वास सोडले. घमेली जिथल्या तिथेच टाकली. काहींनी उभ्या जागी बसकण घेतली. आणि इतर घाम पुशीत हाशहुश करू लागले. बरीचशी मंडळी आपणच काढले का हे दगड अशा अचंब्याने दगडांच्या नव्या ढिगाऱ्याकडे पाहू लागली. जवळच त्या शेताचे मालक आणि विहिरीवर रोज काम करणारे तात्याबा चांदगुडे उभे होते. ते हसून म्हणाले, " दमलात ना ? अहो, एवढाच माल रोज ही मातच पोरं गेले आठ दिवस काढीत होती. " पिवळा हत्ती ओढीत रतनलाल भंडारींनीही मान डोलावली. आणि मी उगाचच आपलें दंड चाचपले. येते एक-दोन दिवस अवघड जाणार हे मी जाणून होतो.

मालकांच्या शेतातला कोवळा लुसलुशीत भाजलेला हुरडा लसणाच्या खमंग चटणीसह खाल्ला. शेजारच्या विहिरीत डुबक्या, सूर, उड्या मारून थोडी मजा केली. रोज जेवढ्या पोळ्या खातो त्याच्या दुप्पट भाकरी गेल्या.

दुपारी पाहुणी मंडळी निघाली, तेव्हा गावाची मंडळी निरोप द्यायला जमली होती. वाटलं तेवढंच ठीक. या निमित्ताने मंडळींत काही चैतन्य निर्माण होतं आहे ना, ती थोडीफार हातपाय तर हलवताहेत ना खूप झालं.

श्रम खूप झाले होते. झोप तावडतोब आली. पण अधून मधून झोपेतच डोळ्यां-समोरून दृश्यं सरकत होती. तुटक तुटक आणि वेगवेगळी. घमेली फेकण्यासाठी केलेली ती ओळ, घुमणारे आवाज, विहिरीत काम करणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्साही चेहरे, भरगच्च पाण्याने भरलेली विहीर – विहिरी आणि तरारून आलेली शेते– पडकी घरं, ओसाड वाडे, खंगलेले चेहरे, काजळलेली संध्याकाळ, उजाड माळरानं आणि खोलच खोल गेलेल्या कोरड्या ठणठणीत विहिरी. हे शेवटचं दृश्य दिसलं तेव्हा मात्र दचकून उठलो आणि पाणी पिऊन पुन्हा झोपलो. ●

[ अधिक काही–पुढील अंकी ]




# अस्थिकाळ

## शरद विनायक काळे

*दर्या रुमरुमत होता. निळीभोर भिंत चालून येत होती. शेंदरी रंगाचे सोवळे नेसून, हातात तबक घेऊन महापुरुषाची पुजा करायला निघत, तसेच तात्या आता त्या निळ्याशार भिंतीवर पळी पंचपात्री घेऊन बसले आहेत, आपल्याला खुणावीत आहेत, असा त्याला भास झाला.*

तात्यांच्या अस्थी घेऊन अच्युत दर्याच्या दिशेने चालला होता

सडकेवरले टोकदार खडे त्याच्या तळपायांना टोचत होते. तांबड्या धुळीने पाय पोटऱ्यांपर्यंत माखून गेले होते. क्षौर केलेले असल्यामुळे ऊन्ह टाळूला भलतेच झोंबत होते; मानेजवळ भलतेच चटकत होते. खरबरीत ढोपरपंचा अंगाला कसासाच वाटत होता. अशी पंचा नेसून अनवाणी पायपीट करण्याची अच्युतला सवय नव्हती.

पण आज असे बाहेर पडावे लागले होते. ते टाळणे अशक्य होते आणि ते करू नये, असेही त्याला वाटत नव्हते. तात्यांचा मोठा मुलगा या नात्याने हे सगळे विधी हातून यथासांग घडायला हवेत; इतकेच नव्हे तर मन्याबापूंच्या मागे तात्यांनी जसा सगळा संसार सांभाळला, भरल्या घोसात चालविला, तसाच तो पुढे पेलण्याची जबाबदारी तात्यांनी आपल्यावर सोपविली, असे त्याला राहून राहून वाटू लागले होते.

तरीही त्याचे मन रुखरुखत होते. शेवटच्या क्षणी तात्या आपल्याला भेटायला हवे होते; आपली वाट बघता बघता ते थकले असतील. शेवटी नाइलाजाने त्यांनी

डोळे मिटले असतील, अशी चुटपुट अच्युतच्या मनाला वारंवार अस्वस्थ करून सोडीत होती.

तात्या ' सीरिअस ' असल्याची तार हॉटेलवर त्याच्या हाती पडली, तेव्हा काहीच सुचेनासे झाले. ते आजारी आहेत, हे निदान आधी तरी ठाऊक असायला हवे होते. असे काही अच्युतच्या ध्यानीमनीही नव्हते आणि अचानक तार आली. निश्चित अशुभ घडले आहे, एकदम आघात होऊ नये, म्हणून अत्यवस्थपणाचा उल्लेख केला आहे, हे त्याच्या जाणत्या मनाने एकाएकी ओळखले. तो लगेच निघाला. गावी जाणाऱ्या गाडीत बसला.

गाडीतून उतरल्यावर धावतच त्याने घरची वाट धरली. त्याला वाटत होते— तात्यांचं अखेरचं जिवंत दर्शन तरी होईल का ? प्राण डोळ्यांत आणले असतील त्यांनी; काही अगदी शेवटचं म्हणून सांगायचं असेल, त्यासाठी ते थांबले असतील. कोणत्याही परिस्थितीत आपल्याला डोळे भरून पाहिल्याशिवाय, हात हाती घेतल्याशिवाय ते डोळे मिटणार नाहीत—

पण पाणंद चढू लागताच अंगणाच्या तटावर पाठीला पोक काढून बसलेले उघडे बोडके लोक दिसले, रडण्याचे सूर कानी पडले, तेव्हा तो सगळे समजून चुकला. मस्तक सुन्न झाले. किंकाळी फोडावी, असे वाटले; पण काय झाले कुणास ठाऊक ! त्याच्या तोंडून आवाज फुटेना. रडे तर अनिवार दाटले असे वाटत होते, पण रडताच येईना. दुःखाच्या धगीमुळे ते आतल्या आत आटल्यासारखे झाले. डोळे कमालीचे झोंबू लागले— कोरडेच—

अच्युत फाटकातून आत आला. क्षणभर थबकून त्याने अंगणातल्या चुळबूळ करणाऱ्या माणसांकडे पाहिलं. दत्तूभाऊंची अन् त्याची नजरानजर झाली. काळवंडलेले चेहरे बघून तो हबकला नि हेलपांडत तसाच आत गेला—फटका बसलेल्या जिवाणूसारखा !



तात्यांचा मृतदेह घोंगडीवर आडवा पडला होता. त्यांच्या तोंडातले तुळशीपत्र विद्रूप दिसत होते. आई, भावंडे, आते–सगळी माणसे गोळा झाली होती.

त्याची चाहूल लागताच आई ओरडून म्हणाली, "हे असं कसं झालं रे अच्युत ?"

रडचाचा कल्लोळ उसळला. तिचे उजाड कपाळ त्याला दिसले. धाकटचा भावाने येऊन त्याला घट्ट मिठी मारली– तो हुंदके देऊ लागला– त्यामुळेच खरे म्हणजे अच्युतला जास्त गदगदून आले. केवळ 'तात्या गेले' या गोष्टीचे स्वतंत्र असे दुःख त्याला तितके तीव्रपणे जाणवले नाही. ते गेल्यामुळे या सगळचा माणसांवर जो आघात झाला, त्यामुळे त्याला भड़भडून आले नि इतका वेळ तुंबलेले रडे उधाणून बाहेर पडले.

दोघे-तिघे आत आले. अच्युतला बाजूला घेऊन शेजारच्या घरी नेण्यात आले; तोपर्यंत प्रेत हलविले गेले.

आकांताची लाट उसळली, आकाशाला भिडली.

तिरीमिरीसरशी अच्युत शेजारघरून बाहेर आला. त्याचे अंग शहारले.

अंगणात ताटीशेजारी तात्यांच्या देहावर गार पाण्याच्या घागरी घडाघडा ओतल्या जात होत्या. थंडगार पाण्याच्या स्पर्शाने त्यांचे शरीर एकदम थकल्यासारखे त्याला वाटले.

कोपऱ्यात एका मडक्यातून धूर बाहेर येत होता.

त्या दुःखावेगातही होऊ नयेत त्या आठवणी अभावितपणे होत होत्या–कानांत सारखे ढोलांचे ध्वनी घुमत होते–'शेजारच्या वाडीतून असं मर्तिक निघालं की वाजवीत गाजवीत स्मशानात नेतात–'हॉस्टेलवरल्या खोलीत एकदा चेष्टेनं आपण प्रात्यक्षिकही करून दाखविलं होतं–

"तिन् तिन् घिनिक् – त – तिन् तिन् तिनिक ! तिन् तिन् वडे – चल चल पुढे !!"

हसून हसून सगळचांची मुरकुंडी वळली होती. लहानपणी असेच एकदा अंत्य-यात्रेच्या वेळी वाजणाऱ्या ढोलांचे आवाज घुमत होते – अंगणात आपण अन् बाकीच्या मुलांनी नकळत ताल धरला. कोरस घुमवायला सुरुवात केली – "तिन् तिन् वडे चल चल पुढे–" रंगून गेले होते सगळे.

अन् अचानक समोरून तात्या आले. चवताळत जळफळत फाडकन कानशिलात बसली – डोळचांपुढे काजवे चमकले...

––हातातल्या मडक्यातल्या रसरसत्या विस्तवावर अच्युतची नजर क्षणभर स्थिरावली. त्याने नकळत मागे वळून पाहिले. तात्यांच्या मिशाच तेवढचा त्याला दिसल्या नि त्यांचा उग्र कठोर चेहरा त्याच्या डोळचांसमोर तरळला. त्याला भय वाटले, 'वेळ कुठली अन् आपल्याला हे सुचतंय काय ? तात्या उठून येऊन

काडकन् श्रीमुख इकडचं तिकडं फिरवून ठेवतील.

खरोखरच थोबाडीत बसल्यासारखे त्याला वाटले. पण त्या तंद्रीमुळे त्याच्या मनात भरभरून येणारे दु:ख ओसरू लागले.

स्मशानातले विधी तटस्थासारखे त्याच्या हातून घडले. मंत्राग्नी देताना मात्र शोक त्याला अनिवार झाला. आकाशात पसरत जाणाऱ्या धुराच्या लोटाकडे तो भरल्या डोळ्यांनी बघत होता...आत्मा, स्वर्ग, पुनर्जन्म–आतापर्यंत कधीही न जाणवलेल्या या गोष्टींची जाणीव त्याला अनाहूत होत होती. आकाश व्यापून टाकणाऱ्या त्या गडद धुराकडे, भडकत्या ज्वालांकडे बघताना त्याला वाटत होते, 'तात्यांचा आत्मा अनंतात विलीन होत आहे...'

आज तिसऱ्या दिवशी समुद्रात अस्थिविसर्जनं करायला चालला असताना अच्युतच्या डोळ्यांसमोर तो धूर पुन्हा गर्दी करू लागला.

समोर सडकेच्या वळणावर उन्हामुळे मृगजळाच्या लहरी झळाळत होत्या. चालता चालता अच्युतची नजर तिथे स्थिर होत होती. आणि तसतशा चितेतल्या ज्वाला लळलळत असल्याचा भास त्याला होत होता. रणरणू लागलेल्या उन्हाच्या त्या लहरींपेक्षा त्या भडाग्नीची धग त्याला अधिक दाहक भासत होती.

सडकेच्या डोंगरालगतच्या वळणाजवळ पायवाट फुटली. पायथ्याच्या कडेकडेने वळणे– घेत ती दर्याची दिशा दाखवू लागली. अच्युतच्या सोबतीसाठी आलेला गडी त्या वाटेने पुढे गेला.

दुतर्फा झाडी लागली. गारवा जाणवला. गड्यामागोमाग अच्युत झपाझप पावले उचलू लागला.

तो चालत होता त्या डोंगराच्या पायथ्याशी विस्तीर्ण भातमळा पसरला होता. बांधाजवळचे नदीचे खाजण दिसत होते. त्या पलीकडे झाडी पांघरलेला दुसरा डोंगर पुढे सरकत होता. दोन्ही डोंगर समुद्रापर्यंत समांतर पसरत होते आणि किनाऱ्याजवळ दोन हातांची ओंजळ व्हावी, तसे जवळ आले होते. तिथे वाळूची छोटी पांढरी टेकडी चमकत होती. त्या ठिकाणी अच्युतला जायचे होते.

हळूहळू दर्याची वेळा दिसू लागली. पांढरी टेकडी जवळ आली. शुभ्र वाळूचा तो प्रचंड ढीग उन्हात चमचमत होता. टेकडी चढून गेले की मोकळा अफाट समुद्र– घुमघुमणारा...

— अच्युतचे पाय टेकडीवरल्या वाळूत पोळू लागले. रखडत, पावले रोवीत तो चढण चढू लागला.

समुद्राची जाग या वेळी स्पष्टतीव्र झाली. ती घसघस, एकदा उसळल्यासारखी वातावरणात निनादून उठे. ध्वनीचा कल्लोळ आसमंतात घुमून राही. मग थोडा वेळ एकदम शांत वाटे. पुन्हा लगेच घोंघावत येणाऱ्या लाटांचे ध्वनी वातावरण भरून टाकीत. अच्युतचे कान बधीर होऊन गेले. गुंगल्यासारखा तो टेकडीच्या माथ्यावर

येऊन पोचला. गार वाऱ्याचे वेगवान झोत सुटू लागले. झपाटल्यासारखा तो पुढे गेला.

—आणि तो थकलाच, स्तंभित झाला !

—खाली अफाट गरजता सागर लखलखत होता. क्षितिजापर्यंत नुसता रुप्याचा चुरा पसरला होता. त्याचे डोळे दिपून गेले. मिटल्या डोळ्यांसमोर गुलाबी—जांभळी वर्तुळे गरगरू लागली. वाऱ्याचे झोत इतके जोराने फणफणत होते की तोल जातोसा वाटत होता.

बरोबर आलेला गडी टेकडी भरभर उतरून खाली गेला. अच्युतही मागोमाग किनाऱ्यापाशी जाऊन पोचला. सैरावैरा धावत सुटावं, वाळूत लोळावं, मनसोक्त डुंबावं, अशी अनिवार इच्छा त्याच्या मनात उद्‌भवली. क्षणभर आपण इथे कशाला आलो आहोत, ते तो विसरूनच गेला ! तो भणभणता वारा, फेसाळत्या लाटा, किरण-पाण्याचे ते जरतारी प्रदर्शन, यांच्या धुंदीत तो गुरफटला, तसाच पुढे सरकला.

गार गार पाण्याचा स्पर्श त्याच्या पावलांना सुखवीत होता. किनाऱ्याकडे धाव घेणारी एक उच्छृंखल लाट त्याच्या पायाभोवती घोटाळली, पुढे सरली नि सळसळत परत वळली. मग दूरवरून गडद पाण्याची एक उंच उंच भिंत वेगाने किनाऱ्याकडे सरकू लागली. अच्युत आ वासून तिकडे बघू लागला. लाट थोडी पुढे आली, मुरडल्यासारखी झाली नि निमिषार्धात काळ्याकभिन्न खडकावर आदळली — शुभ्र फेसाचे ढीग उसळले. चंदेरी तुषारांची कारंजी उंच फेकली गेली.

अनिमिष नेत्रांनी अच्युत तिकडे बघत होता. त्याला भास होत होता — चिता धडधडते आहे, ज्वाला अस्मानाला भिडू पाहत आहेत, ठिणग्यांचे फवारे उडत आहेत...

मागून गडी ओरडला, " लय् म्होरं जाव् नको हां —"

अच्युत भानावर आला. त्याच्या पोटऱ्यांपर्यंत पाणी आले होते. मग त्याने अस्थींचे गाठोडे अलगद एका हाताने धरले, दुसऱ्या हाताने त्याची गाठ सोडली. आतल्या वेड्यावाकड्या अस्थी उघड्या पडल्या.

आतापर्यंत दोन वर्षे कॉलेजातल्या प्रयोगशाळेत त्याने अनेक सांगाडे, कवट्या, हाडे बघितली होती; पण या पिवळट पांढऱ्या अस्थींकडे बघताना त्याचे अंतःकरण भारावून गेले.

गड्याने पुन्हा सांगितले, " हां — थयंच न्हवा-उबे, नि सोडा दर्यात आता — "

हात पुढे करून फडक्यासकट त्या अस्थी अच्युतने सागरार्पण केल्या. आणि भक्तिभावाने हात जोडले.

स्मशानात तात्यांच्या देहातून धूर निघालेला, अग्नीने त्याला कवटाळलेला अच्युतला दिसला होता. याक्षणी तात्यांच्या उरल्या सुरल्या अस्थी फेसात मिसळत होत्या. त्याला वाटले, " तात्यांचा आत्मा असीमाशी समरस होत आहे !"

–तात्यांनी शिकवलेले सूक्त त्याच्या तोंडून अभावितपणे उमटू लागले,

" ॐ असतो मा सद्गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्यो ऽ र्मा अमृतं गमय
ॐ शांतिः शांतिः शांतिः । "

डोळे मिटून तो कितीतरी वेळ तिथेच उभा होता.

–समोर एका माशाने पाण्याबाहेर उसळी घेतली. अच्युत दचकला, अन् मागे वळला.

–अचानकपणे हात मोकळा असल्याची जाणीव त्याला झाली. या वेळेपर्यंत अस्थी बरोबर होत्या,–त्या रूपाने तात्या सहवासात होते; आता ते नाहीत, हे त्याला जाणवले आणि भलतेच ओके ओके वाटू लागले. आधार सुटल्यासारखे झाले. 'तात्या गेले – कायमचे ' या गोष्टीची दाहकता तीव्रपणे जाणवू लागली. तिथल्या तिथे एका खडकावर बसून अगतिकासारखा तो समोरच्या जलविश्वाकडे बघू लागला.

" चलूंया ना आता ?" गडी विचारीत होता.

मुकाटपणे अच्युत उठला. फार तहान लागली होती. पण समोर सारे खारे साम्राज्य पसरले होते. अच्युतने त्या पाण्याचे सपकारे तोंडावर मारले. टाळूवर ते थापटले. टवटवी वाटली. घोटाळणाऱ्या लाटांतून पाय सरकवीत तो वाळूवर आला. गड्याने पिशवी पुढे केली. बाटलीतले पाणी अच्युत घटाघट प्याला.

बाटली परत पिशवीत ठेवीत गडी म्हणाला, " मन्याबापू गेले तवां तात्या इथच इले हुते – असेच खुळ्यासारखे करीत हुते !"

वाळूवर पसरलेली आपली वेडीवाकडी सावली नि उपड्या तांब्यासारखा डोक्याचा भाग अच्युतला दिसला–तात्या इथेच उभे राहिले असतील का ? काय विचार आले असतील त्यांच्या मनात ? मन्याबापूंनंतर तात्या–त्यांच्या पश्चात आपण–केवढ्या आपल्या महत्त्वाकांक्षा होत्या ? हुशार व्हायचं–सायन्सला जायचं–मेडिकला जायचं–एम्. बी. बी. एस्. व्हायचं–ते शक्य आहे का ? तात्यांनी व्याप किती वाढवून ठेवलाय ? तो कोण सांभाळणार ? गजा असता तर त्यानं हे पेललं असतं–त्याला त्यात गोडीही होती–पण ऐन भरात तो गेला–होणं जाणं हाती नाही–आपल्या अंगी उमेद आहे–पण आता काय करायचं ? आई, भावंडं, प्रपंच, बागबागायत, घरदार सोडून द्यायचं ? केवढी जबाबदारी आहे ही ! हा अफाट व्याप तात्यांइतक्या हिरीरीनं, हुरूपानं आपल्याला आवरता येईल का ? मन्याबापूंनंतर त्यांनी संसार सजवला आहे–तो टवटवीत राखणं, जोपासणं, वाढविणं, त्याच्यातच समरसून जाणं... होईल का हे ? झेपेल ना सगळं ?...

किनाऱ्यापाशी लाटा फुटत होत्या. समोर अथांग सागर पसरला होता–एकाएकी अवसान आल्यासारखे होऊन अच्युत उत्तेजित झाला. मग विचार करीत न राहता

तो वळून चढून टेकडीच्या टोकावर आला. पण एकावर वळून पाहिल्याशिवाय त्याच्याने राहवले नाही.

–दर्या रुमरुमत होता–निळीभोर भिंत चालत येत होती. तिच्यावर एकदम तात्या बसलेले अच्युतला दिसले. पळीपंचपात्री धरलेला हात वर करून ते त्यालाच खुणावीत होते. तो स्तिमित झाला. शेंदरी रंगाचे सोवळे नेसून तबक घेऊन महापुरुषाची पूजा करायला ते बाहेर पडत, तसेच आता दिसत होते–नखशिखांत निथळत होते म्हणत होते–" अच्युतरे, थांब–आलोच मी ! "

–गडी दूर जाऊन हाका मारीत होता. अच्युत दचकला.

किनाऱ्याजवळ घसघस, खळखळ झाली–फेस उसळून उठला–तात्यांची मूर्ती त्यात अदृश्य झाली. त्यांच्या तबकातली फुले उधळली.

पण या भासामुळे अच्युतला एकदम मोकळे मोकळे, ताजेतवाने वाटले. तात्या गेले नाहीत, ते आपल्या पाठीशी उभे आहेत, या जाणिवेने त्याचे मन फुलून निघाले. मग मागे वळूनही न बघता तो टेकडी उतरू लागला.

वाट झरझर मागे पडत गेली–सडक लागली. धूळ तापली होती–ती त्याला जाणवलीच नाही.

घरालगतच्या घाटीच्या टोकावर तो आला. तेव्हा खालून दत्तूभाऊ येत असलेले त्याला दिसले. ते म्हणाले,

" कितीरे हा उशीर? वैनी काळजी करायला लागलीय. दुपार ढळून गेली, तेव्हा शोधायला बाहेर पडलो मग ! "

" काळजी कसली एवढी ? "

–अच्युतच्या स्वरांतला निश्चिंतपणा दत्तूभाऊंना जाणवला. उन्हाने रातांब्यासारखी लालेलाल होऊन गेलेली त्याची गोरीमोमटी मुद्रा ते न्याहाळू लागले.

अच्युतचे तिकडे लक्ष नव्हते. घाटीच्या उतारावरल्या एका बाजूची डेरेदार कलमे, त्यांची बांधणी, स्वच्छ परिसर, अन् सर्वत्र दाटून राहिलेली शीतल सावली त्याच्या मनाला सुखवीत होती. वारं प्याल्यासारखा तो घाटी उतरू लागला.

पुढले सात-आठ दिवस तो सगळी वतनवाडी हिंडला, कलमांत फिरून आला–सड्यावर गेला. तात्यांनी अरण्य तोडून साफ करून घेतलेल्या अडीतल्या भागातले काम त्याने सुरू ठेवण्याविषयी गड्यांना सांगितले एंजिन बिघडले होते. ते दुरुस्त करण्यासाठी स्वत: हत्यारे घेऊन त्याने कंबर कसली. मध्ये चार-पाच दिवस माडाचे शिपणे बंदच होते. ते लवकर सुरू करायला हवे होते...

दहाव्या दिवशी पिंडदान झाले. या प्रकरणाविषयी अच्युतच्या मनात अविश्वासाची भावना होती. प्रथमपासून तो त्या दिवशी अलिप्तपणे वागत होता. कर्तव्य म्हणून भटजी सांगतील ते करीत होता. तात्या नाहीत, तेव्हा मुलगा मन मानेल तसे वागायला मोकळा झाला, आपली बूज उरली नाही, असे आईला वाटू नये

एवढ्यासाठी तो निमूटपणे सगळे पार पाडीत होता.

प्रथमत: पिंडाला कावळा शिवेचना. सगळे करून झाले. नारळीतल्या बागेतल्या नव्यानं धरलेल्या पोफळीची सुपारी ठेवून झाली. शेवटच्या दिवशी 'ज्ञानेश्वरी' वाचण्याचा तात्यांचा नेम चुकला होता. ते दत्तूभाऊंच्या लक्षात आले म्हणून अच्युतने 'पसायदान' म्हटले. त्यांना नारळाची बर्फी फार आवडायची—तात्या जायच्या पूर्वी आईने ती केली होती. पण त्यांच्या मुखी लागण्याचा योग नव्हता. तेव्हा बर्फीच्या दोन वड्या अच्युतने पिंडाजवळ ठेवल्या. पण कावळे झाडावरून खाली उतरत; पिंडाच्या भोवती घिरट्या घालीत; पण जवळ कुणी जाईना; पिंडाला शिवेना.

मग दत्तूभाऊंनी अच्युतला एकीकडे बोलावून घेतले. म्हणाले, "तुझा विश्वास बसो न बसो! मला आपलं वाटतं की तात्या काळजी करीत असावा. मला अलीकडे तो म्हणायचा, "समज, माझं बरंवाईट झालं तर कोण बघणार रे हे सगळं ?" अच्युत इथं राहील का ? राहिला तरी त्याच्यानं गावकुठारकी निभेल का ? की त्या वासू गोडबोल्याच्या दाम्यासारखं फुंकून टाकील ?"

"शक्य नाही ते— मला काय कळत नाही ?"

क्षणभर अच्युतला समजेना, दत्तूभाऊ स्वत:च्याच मनातली शंका व्यक्त करीत आहेत काय ? या मिषानं ते आपल्याला कर्तव्याची जाणीव तर देत नाहीत ना ?

दत्तूभाऊ सांगतच होते — "वासू गोडबोल्यांचा दामू एकुलता एक होता. वासूनानानंतर तो व्यसनी निघाला — सोन्यासारखी वतनवाडी धुळीला मिळाली— पण तो एकटा होता, म्हणून जमून गेलं, कुणाला विशेष त्रास झाला नाही—"

"पण हे सगळं मला ठाऊक नाही, असं तुम्हांला वाटतंय का ?"

"ठाऊक आहे-- परंतु ! पण आता तुला ते उघड करायला हवं— तुझ्या बुद्धीला पटो न पटो-- तात्याला तेच हवं आहे, आईला तेच हवं आहे."

समजूतदार मुलासारखा अच्युत मग पुढे झाला. हात जोडून पिंडाकडे बघत

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड
शर्मा स्वीट मार्ट
दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

तो मोठ्याने बोलू लागला, " तात्या, तुमचा अच्युत वयानं लहान आहे-- शहरी बनला आहे-- पण काळजी करू नका--- मी इथंच राहणार आहे-- सगळं सांभाळणार आहे-- तुमचे आशीर्वाद असू देत-- तुमच्यापेक्षाही जोमानं--"

-- त्याचे वाक्य पुरे व्हायच्या आत एका कावळ्याने फांदीवरून खाली सूर मारला नि पिंडातली शितकणे मावतील तेवढी चोचीत भरून घेऊन तो दूरच्या झाडाकडे उडाला- मग कावळ्यांची झुंबड पिंडाभोवती उडाली.

सुतक संपले- तेराव्या दिवशीच्या वाड-जेवणाची तयारी अच्युतने मालकाच्या थाटात करून घेतली. वाडीतले बाप्ये खीर भुरकीत असताना त्यानं यजमानासारख्या मंडपातून फेऱ्या घातल्या. संध्याकाळी तात्यांच्या पेटीतले नवे धोतर काढून त्याने नेसले. शुभ्र शर्ट घालून नि तात्यांची तपकिरी उंच टोपी घालून तो देवळात गेला. जाताना नकळत धोतराचा सोगा हातांत धरून, मान इकडे तिकडे- तो चालत होता. तात्या असेच चालत ! मग ग्रामपंचायत, पोस्ट ऑफिस, विठ्ठल पाटणकरांचे दुकान, आरोग्यकेंद्र या ठिकाणीही तो तात्यांसारखाच जाऊन आला.

दुसऱ्या दिवशी गड्यांना त्याने सांगितले, " आज आमच्या बागेतली मळ्यातील विहीर उपसायचीय. तात्या म्हणाले होते, यंदाच्या उन्हाळ्यांत पाणी आटेल तेव्हा विहीर आणखी खोदायची- आटली, बसली तर एंजिनच्या मदतीनं आटवायची- सगळ्या बागेला पाणी पुरून उरायला हवं- नाहीच पुरलं तर दुसरी विहीर खोदू. "

त्याने स्वत: जाऊन एंजिनाचे हँडल फिरविले. एंजिन सुरू झाले- " झाक्-झुक्-झाक्-झुक् ! "

--मोठ्या पाइपातून विहिरीतले पाणी घसघसत बाहेर पडू लागले. पाटापाटांतून फिरू लागले.

पाण्याची रुंद धार उसळत होती. तिथे शुभ्र फेसाचा पुंज जमला होता. अनिमिष नेत्रांनी अच्युत तिकडे बघत होता- अस्थिविसर्जनाच्या वेळी लाटा अशाच पुढे येत होत्या- उंच लाट गर्जत पुढे येत होती- सोवळे नेसलेले तात्या, पळीपंचपात्री धरलेला हात, वर करून खुणावीत होते- म्हणत होते, " अच्युत रे ! ..."

अच्युतला भास झाला, - तात्या पुढे आले. पाठ थोपटीत खुषीनं म्हणाले, " शाब्बास ! बापसे बेटा सवाई आहेस- चिरंजीव हो- यशवान्- यशवान् हो ! "

आपल्या पाठीवरून त्यांचा हात फिरतो आहे, खरखरीत स्पर्श होतो आहे, असे खरोखरच अच्युतला वाटले. खात्री करून घेण्यासाठी त्याने वळून पाहिले-

--चार-पाच वर्षांपूर्वी तात्यांनी लावलेल्या सिंगापुरी माडाची एक झावळी वाऱ्याने लवत होती. तिच्या पात्या त्याच्या पाठीशी घासत होत्या !


--त्या लांबसडक पात्यांवरून अच्युत मोठ्या आदराने हात फिरवू लागला !

●

# रसाचा थेंबही फुकट न घालवणारा

## किर्लोस्कर उसाचा चरक

Regd. T. M.



किर्लोस्कर उसाचे चरक वापरल्याने कोणत्याहि इतर चरकांपेक्षां अधिक काटकसर, कार्यक्षमता व कामाचा जलद उरक असा तिहेरि फायदा होतो. रोलर्स, गिअर्स व बेअरिंग्ज इत्यादी सर्व भाग भक्कम पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटलपासून तयार केलेले असून वर्षानुवर्षे बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. ५, १० व १५ हॉ. पॉ. आणि २, ४ व ६ बैलांकडून चालणारे असे निरनिराळ्या आकारांतील चरक तयार होतात.



निर्माता :

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड,** किर्लोस्करवाडी, जि. सांगली.

R STUSA KM 5/62

# आणि ड्रॅगन जागा झाला

जनरॅलिसिमो चँग-कै-शेकला अटक केली जात असतानाच मांच्युरियन सेनापतींनी आपली भूमिका स्पष्ट करणारे एक मोठे निवेदन तयार करून ते तारेने नानकिंग सरकारकडे पाठविले. त्याचबरोबर चीन-मधील सर्व प्रांतीय सरकारांना ते पाठवून सियान रेडिओवरून ते पुन्हा पुन्हा प्रक्षेपित करण्यात आले. सबंध चीनभर मांच्युरियन सैन्याचा खरा उद्देश जपान विरोधाचा आहे, ही भूमिका कळावी, असा त्यामागे हेतू होता.

रेडिओवरून चँगला अटक करण्यात आली आहे, असे न सांगता "त्याची सद्सद्विवेकबुद्धी जागृत करण्यासाठी चँग-कै-शेकने सियान येथेच काही दिवस राहावे, अशी त्याला विनंती करण्यात आली आहे," असे जाहीर करण्यात आले. त्याच्या संरक्षणाची हमी देण्यात आली आणि त्याच्यापुढे मांडण्यात आलेल्या आठ मागण्या प्रक्षेपित करण्यात आल्या. त्यांपैकी प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे होत्या.

१. नानकिंग सरकारची पुनर्घटना करून सर्व पक्षांना स्थान देणारे संयुक्त सरकार स्थापावे.

२. नागरी युद्ध ताबडतोब थांबवून जपानला सशस्त्र प्रतिकार करावा.

३. डॉ. सन-यत-सेनच्या मृत्युपत्रातील तत्त्वे अंमलात आणावीत.

४. राष्ट्रीय मुक्ती सभेची बैठक ताबडतोब भरवावी.

या मागण्या दडपून टाकण्याचा सर्व चीनभर कोमिंटांग सरकारने प्रयत्न केला. केवळ चँग-कै-शेकला बंडखोर मांच्युरियन सैन्याने अटक केली असून त्याच्या जिवाला धोका आहे, असे कोमिन्टांग सरकारतर्फे नानकिंग रेडिओवरून सांगण्यात येत होते. दरम्यान जनरॅलिसिमो चँग-कै-शेकशी शांततेची बोलणी करण्यासाठी यंग मार्शलने कम्युनिस्ट प्रतिनिधींना आमंत्रण दिले. मांच्युरियन सैन्याने ज्या आठ मागण्या पुढे मांडल्या होत्या त्यांना लाल सैन्य, सोव्हिएट सरकार आणि कम्युनिस्ट पक्ष यांनी ताबडतोब आपला पाठिंबा जाहीर केला होता; कारण या मागण्यांपैकी सात कलमे कम्युनिस्टांनीच स्वत: वेळोवेळी पुढे मांडली होती. यंग मार्शलशी कम्युनिस्टांची बोलणी होऊन त्यांचे याबाबतीत मतैक्यही झाले होते; परंतु आपल्या मागण्यांसाठी यंग मार्शल असे क्रांतिकारक पाऊल उचलेल याची कम्युनिस्टांना अपेक्षा नव्हती.

माओ-त्से-तुंगने सोव्हिएट सरकारचा प्रतिनिधी म्हणन चाऊ-एन्-लायला यंग

# अरुण साधू

## उत्तरार्ध

लेखांक : नववा

मार्शलशी बोलणी करण्यास सियान येथे पाठविले. कम्युनिस्टांचा पक्का हाडवैरी आता त्यांच्या हाती सापडला होता. केवळ चॅंग-कै-शेकमुळेच कम्युनिस्टांना चीनमध्ये देशोधडीला लागावे लागले होते. असंख्य कम्युनिस्टांना प्राणाला मुकावे लागले होते. चॅंग-कै-शेक कम्युनिस्टांच्या प्राणावरच उठला होता. तो आता यंग मार्शलच्या हाती सापडला आणि यंग मार्शलचे अनेक सेनापती चॅंगला ठार करा, अशी सारखी मागणी करीत होते. कम्युनिस्ट प्रतिनिधींनी याच सुरात सूर मिसळला असता तर चॅंगचा जीव वाचणे कठीण होते.

परंतु आश्चर्याची गोष्ट ही की, माओ-त्से-तुंगची चाऊ-एन-लाय याला सक्त आज्ञा होती, की काहीही करून चॅंगचा जीव वाचविलाच पाहिजे.

### चॅंगला ठार मारण्यातील धोका

आपला हाडवैरी चांगला हाती आला असताना त्याला जिवंत सोडण्यामागे माओचा वेगळाच हेतू होता. चॅंग-कै-शेकच्या व्यक्तिमत्त्वामुळेच चीनची मध्यवर्ती सत्ता शाबूत राहिली आहे, हे माओ जाणून होता. एकदा चॅंग गेला की आत्ताच डावी-उजवीकडे ओढणारे कोमिन्टांगमधील गट फुटून आपापसांत भांडू लागतील. उजवे गट कम्युनिस्ट निर्मूलनाचे कार्यक्रम अधिक जोरात आखतील. जपानधार्जिणे गट जपान्यांच्या हाती आणखी काही प्रांतांचे उदक सोडतील आणि कोमिन्टांगचे काही सैन्य कम्युनिस्टांशी आणि काही आपसांत लढत असताना जपानला सारे रान मोकळे सापडेल आणि सारा देश त्यांच्या ताब्यात जाण्याचा धोका उत्पन्न होईल. असे झाले की, जपान्यांच्या शक्तीपुढे लाल सैन्याचा आणि सोव्हिएट तळांचा मुळीच निभाव लागणार नाही. हे सारे हिशेब माओपुढे होते; आणि म्हणूनच चॅंगचा जीव वाचविण्याची त्याला पोटतिडीक वाटत होती.

इकडे सियानला जनरॅलिसिमो चॅंग-कै-शेक आपल्या जिवाची आशा सोडून बसला होता. या मागण्यांचा प्रश्न लोकांपुढे निर्णयासाठी मांडण्यात येईल, असे त्याला यंग मार्शलने सांगितले होते. त्याचा अर्थ उघड होता. आपला जीव सुरक्षित नाही, हे चॅंगला कळून चुकले. नानकिंगहून येणाऱ्या बातम्याही त्याला झोप येऊ देत नव्हत्या. चॅंग गेल्यानंतर त्याची जागा कोण घेणार याविषयी आतापासूनच तिथे भांडणे सुरू झाली होती. त्याच्या युद्धमंत्र्याने तर वीस डिव्हिजन्ससह सियानवर

चाल करून येण्याची घोषणा केली होती. तो खरोखरच चाल करून आला तर चँगचा जीव वाचणार नव्हता. चीनमधील दहा प्रांतांतील गव्हर्नरांनी नागरी युद्ध चालू ठेवण्यास नापसंती दर्शविली होती तर होपेई आणि शांटुंगच्या गव्हर्नरांनी चँग आणि यंग मार्शल यांनी आपसांत बोलणी करून शांततेने भांडण मिटवावे, अशी भूमिका घेतली होती. चँगच्या बाजूने भांडणारा एकही प्रांत नव्हता.

दरम्यान १४ डिसेंबरला जपानविरोधी संयुक्त आघाडी स्थापना झाल्याची घोषणा यंग मार्शलने केली. या आघाडीत सुमारे १ लाख ७० हजार मांच्युरियन सैनिक आणि ९० हजार लाल सैनिक होते. या सैन्याने भराभर हालचाली करून शेन्सी, शान्सी आणि कान्सू प्रांतांतील कोमिन्टांग सैन्याला निःशस्त्र केले आणि मोक्याच्या जागा अडविल्या. हे करीत असताना आम्हांला नवे नागरी युद्ध सुरू करायचे नसून राजकीय पवित्र्याच्या दृष्टीने या हालचाली केल्या, असेही या आघाडीने स्पष्ट केले.

हे घडत असतानाच चँग-कै-शेकला ठार केल्याचा आणि मांच्युरियन व लाल सैन्य उत्तर चीनमध्ये लुटालूट करीत असल्याचा प्रचार कोमिन्टांग रेडिओवरून होत होता. सियान शहरात होत असणाऱ्या अत्याचारांची 'चक्षुर्वैसत्यम्' रसभरित वर्णने रेडिओवरून प्रसारित केली जात होती आणि सियानहून येणाऱ्या साऱ्या खऱ्या बातम्या अडविल्या जात होत्या. परंतु सियानहून येणाऱ्या या खळबळजनक बातम्यांचा लोंढा एका आठवडाभराच्यावर कोमिटांग सरकार थोपवू शकले नाही. पुढे हळूहळू खरी परिस्थिती चिनी जनतेला कळू लागली.

चँग-कै-शेक हा अतिशय स्वाभिमानी होता. प्रथम काही दिवस त्याने यंग मार्शलशी बोलण्यासही नकार दिला. मरणाची त्याची तयारी होती; पण आपल्याशिवाय चीनचे हित होणार नाही, हे जेव्हा त्याला कळून चुकले, तेव्हा तो हळूहळू बोलू लागला आणि पुढे तर त्याने कम्युनिस्ट प्रतिनिधींशी बोलणी करण्यासही संमती दिली.

सियानमध्ये येताच चाऊ-एन्-लाय चँग-कै-शेकशी बोलणी करण्यास गेला. त्यांची भेट किती विचित्र परिस्थितीत झाली, याची कल्पनाच केलेली बरी. चाऊ-एन्-लायचे डोक्यावर चँगने ४ लाख रुपयांचे बक्षीस लावले होते! दिनांक १७ डिसेंबर ते २५ डिसेंबरपर्यंत चँग, चाऊ-यंग मार्शल यांच्या सतत रात्रंदिवस बैठकी होत होत्या. हळू हळू चँगने मागण्यांवर बोलायला सुरुवात केली. नानकिंगहून चँगची पत्नी आणि त्याचे दोन सल्लागार टी. व्ही. सुंग आणि डोनाल्ड हेही सियानला आले. आणि शेवटी बऱ्याच चर्चेनंतर चँगने बंडखोऱ्यांच्या मागण्यांना तत्त्वतः मान्यता दिली; परंतु कोणत्याही तऱ्हेचा लेखी करार केला नाही. आणि चँगची प्रतिष्ठा वाचविण्यासाठी बंडखोरांनीही लेखी करार करण्याचा आग्रह धरला नाही.

## चँगचे नानकिंग-प्रयाण

बोलणी सफल झाली, पण या वेळपर्यंत मांच्युरियन सैन्यातील तरुण अधि-

ऱ्यांनी चँग-कै-शेकला शिक्षा म्हणून ठार करण्याचा एकच लकडा लावला होता आणि त्यांचे समाधान करण्याचे काम कम्युनिस्टांकडे होते. या सबंध धावपळीत चँग-कै-शेकच्या जिवाची काळजी घेतली ती कम्युनिस्टांनीच. खुद्द चँगची बायको मादाम चँगनेही हे कबूल केले आणि चँगचा ऑस्ट्रेलियन सल्लागार डोनाल्ड यानेही पुढे एके ठिकाणी लिहिले, " केवळ चाऊ-एन्-लायमुळेच चँग–कै-शेक सियानहून सुखरूप परतू शकला. " आणि चँग २५ डिसेंबर रोजी आपली बायको आणि सल्लागारांसह विमानाने सियानहून नानकिंगला परतला.

पण तो परतला तो बरोबर यंग मार्शल चांग-हसुये-लियांग याला बरोबर घेऊनच. चीनमधील उच्चभ्रू लोकांच्या प्रतिष्ठेच्या कल्पना फार विचित्र असतात. प्रतिष्ठा राखणे म्हणजे ' चेहरा वाचविणे. ' अटक झाल्यामुळे चँगचा चेहरा गेला होता, तरी त्यातल्या त्यात त्याने लेखी करार न करता आपला ' चेहरा वाचविण्या 'चा प्रयत्न केला होताच. आता अटकेत गेलेला आपला चेहरा वाचविण्यासाठी त्याने आणखी एक गोष्ट केली. यंग मार्शलला चँगविषयी अतिशय आदर होता. त्याच्या पंधरा दिवसांच्या अटकेत यंग मार्शलने चँगला मोठ्या इतमामाने वागविले होते. त्याला नानकिंगला परतण्यासाठी यंग मार्शलने स्वतःचे विमानही दिले. चँग त्याला म्हणाला, "तू बंडखोरीचा गुन्हा केलेला आहेस. तुला शिक्षा झाली पाहिजे. माझा कैदी म्हणून तू माझ्याबरोबर चल. " आणि चँगचा चेहरा वाचविण्यासाठी यंग मार्शल या स्वार्थत्यागाला तयार झाला. आपली पावणेदोन लाखांची सेना सोडून यंग मार्शल चँगबरोबर नानकिंगला आला. चँगने त्याच्यावर बंडखोरीबद्दल खटला भरला आणि दहा वर्षे सक्त कारावासाची सजा त्याला देण्यात आली. १९४९ साली चँग चीनची मुख्य भूमी सोडून फॉर्मोसात पळून गेला तेव्हा आपल्याबरोबर त्याने आपल्या कैद्यालाही नेले आणि तब्बल चोवीस वर्षांच्या कैदेनंतर ३१ ऑगस्ट १९६१ ला त्याला मुक्त केले. यंग मार्शलने चँगला फक्त १२ दिवस अडकवून ठेवले होते. त्या प्रत्येक दिवसासाठी यंग मार्शलला दोन-दोन वर्षांची किंमत द्यावी लागली !

नानकिंगला आल्यावर सर्वप्रथम आपण कुणालाही कुठल्याही तऱ्हेचे आश्वासन दिले असल्याचे चँग-कै-शेकने नाकारले; परंतु पुढे हळू हळू त्याने नागरी युद्ध थांबविले, नावापुरती संयुक्त आघाडी स्थापन केली आणि जपान्यांना प्रतिकार करण्यासही त्याने प्रारंभ केला. कम्युनिस्ट निर्मूलनासाठी सियान येथे त्याने उघडलेली मुख्य कचेरी बंद केली. सर्व अंतर्गत युद्ध जवळ जवळ थांबले. काही काही उत्तर प्रांतांत कोमिन्टांग सैन्य आणि लाल सैन्य परस्परांच्या अगदी जवळ पण कुठल्याही संघर्षाशिवाय तळ ठोकून होते. चँगने अखेर लाल सैन्याचे अस्तित्व मान्य केले. आणि १५ जुलै १९३७ रोजी दोन्ही बाजूंनी आपसातील तहाला अधिकृत मान्यता दिली.

तहाला चटकन अधिकृत मान्यता मिळण्यास महत्त्वाचे कारण घडले होते.

मांच्युरिया आणि उत्तर प्रांतांच्या समोवार जपानी सैन्य पाय रोवून बसले होते. कधी तरी आत घुसून हे सैन्य संपूर्ण चिनी भूमी ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणार, हे कम्युनिस्टांप्रमाणेच चँग-कै-शेकही जाणून होता. त्याच्या हिशेबाप्रमाणे १९३७ च्या ऑगस्ट–सप्टेंबरच्या सुमाराला जपानी आक्रमणाची शक्यता होती. परंतु त्या आधीच जपानने ७ जुलै च्या सकाळी आघाडीवर हल्ला चढवून मोठ्या चढाईला आरंभ केला. आणि मोठ्या युद्धाला तोंड लागलेले पाहताच कम्युनिस्टांनी आणि कोमिंटांगने काही अटी पत्करून तह केला. तहानुसार आपली शेती पुनर्वाटपाची आणि उघड बंडखोरीची धोरणे सोव्हिएट सरकारला सोडून द्यावी लागली तर कोमिंटांग सरकारला लाल सन्यास अधिकृत मान्यता द्यावी लागली.

कम्युनिस्ट आणि कोमिन्टांगची चिनी इतिहासातील ही दुसरी हातमिळवणी होती. पहिल्या वेळी, १९२७ साली, चँग-कै-शेकने कम्युनिस्टांचे शिरकाण करून या आघाडी-तून कम्युनिस्टांना हाकलून लावले होते. आताची स्थिती वेगळी होती. कम्यु-निस्टांच्या लाल सैन्याने दरम्यान प्रचंड ताकद कमाविली होती. आणि १९२७ प्रमाणेच हीही आघाडी चिनी इतिहासावर दूरणामी परिणाम घडविणारी ठरणार होती.

## शेतकरी संघटना : लाल सैन्याचे खरे यश

१९३७ च्या जपानी आक्रमणानंतर उत्तर चीनमध्ये जे घडले त्याला एक युगो-स्लाव्हियाशिवाय जगाच्या इतिहासात अन्य तोड नाही. चिनी शेतकरी हा युद्धा-बद्दल सतत उदासीन. शेताच्या पलीकडे जपानी आणि चिनी सैनिकांचे घनघोर युद्ध चालू आहे आणि शेतकरी तिकडे मुळीही लक्ष न देता आपले शेत शांतपणे नांगरतो आहे, अशा पूर्वीच्या चिनी-जपानी युद्धाच्या कथा सांगतात; पण या वेळी चिनी शेत-करी खवळून उठला होता आणि यांग–त्से नदीच्या उत्तरेकडील सुमारे दहा कोटी शेतकऱ्यांनी अभूतपूर्व रीतीने जपानी आक्रमणाचा प्रतिकार केला. या वेळचे जपानी आक्रमण अतिशय क्रूर होते. शेतकऱ्यांचा प्रतिकार मोडण्यासाठी जपानी सैन्य खेडीच्या खेडी उद्ध्वस्त करीत, जाळपोळ करीत पुढे सरकत होते. चिनी शेतकऱ्यांच्या मनांत जपान्यांबद्दल आधीच घृणा उत्पन्न झाली होती; त्यातच जपानी सैन्य त्यांच्या जीवनामध्ये जेव्हा अडथळे आणू लागले, तेव्हा शेतकऱ्यांची युद्धाबद्दलची उदासीनता मावळली. त्यांच्यांत नवे चैतन्य निर्माण झाले. आता फक्त त्यांना संघटित करणारे प्रभावी नेतृत्व हवे होते आणि कम्युनिस्टांनी असे नेतृत्व त्यांना पुरविले.

जपानी सैन्याला चीनमध्ये सर्वांत जास्त प्रतिकार झाला असेल तर गनिमी काव्याने लढणाऱ्या चिनी शेतकऱ्यांकडून " शेतकऱ्यांचा राष्ट्रवाद आणि कम्युनिस्ट सत्ता " या आपल्या ग्रंथात चामर्स जॉन्सन या अमेरिकन लेखकाने लिहिले आहे, " जपान्यांचे चीनमधील राजकीय आणि लष्करी हेतू साध्य होऊ शकले नाहीत, याचे मुख्य कारण ते चिनी शेतकऱ्यांकडून प्रतिसाद मिळवू शकले नाहीत, हे होय.



*मुलांची खेळणी म्हणजे लुटुपुटूच्या*
*बंदुका, हात बॉम्ब आणि सुरुंग.*

जपान्यांना खरा प्रतिकार केला तो कम्युनिस्टांनी आणि कम्युनिस्टांनी आपली ताकद उभारली ती शेतकऱ्यांना संघटित करून व त्यांच्यांतील देशप्रीतीच्या भावनांना आवाहन करून. चिनी कम्युनिस्ट पक्ष आणि आणि चिनी शेतकरी यांच्यांतील समन्वयामुळे जपानी सैन्याला मोठा प्रतिकार तर झालाच. पण त्याबरोबर उत्तरेचा चिनी शेतकरी समाज मोठ्या प्रमाणात प्रथमच चीनच्या राजकारणात ओढला गेला."

नागरी युद्धाचा अडसर तात्पुरता दूर झाल्याबर लाल सैन्याला आणि लाल प्रचारकांना खरे रान मोकळे सापडले. शेन्सी-कान्सू या प्रांतांच्या उत्तर भागातून लाल सेना निर्भयपणे दौडू लागल्या आणि ठिकठिकाणी जपानी आघाड्यांवर गनिमी हल्ले चढवून जपानी सैन्याला बेजार करू लागल्या. जपानी आघाड्यांच्या मागे जाऊन जपान्यांनी ताब्यात घेतलेल्या प्रदेशात लाल सेना शेतकऱ्यांचे उठाव घडवून आणू लागल्या. दहा वर्षांच्या वनवासात आणि सततच्या युद्धात तयार झालेले असंख्य नेते लाल सैन्यात होते. त्याचबरोबर कुशल प्रचारकही हाताशी होते. जपानी अंमलाखाली आलेल्या शेतकऱ्यांना संघटित करणे प्रचारकांच्या दृष्टीने सोपे काम होते. अधिक जमीन जप्त करणे, जमिनीचे पुनर्वाटप अशा मोठ्या शेतकऱ्यांमध्ये काहीशा अप्रिय ठरणाऱ्या गोष्टी कम्युनिस्टांनी तात्पुरत्या टाकून दिल्या आणि देशभक्ती, राष्ट्रीय

स्वातंत्र्य, राष्ट्रासाठी स्वार्थत्याग अशा भावनांना त्यांनी आवाहन करण्यास सुरुवात केली. त्यामुळे ते चटकन शेतकऱ्यांपर्यंत पोचू लागले.

कम्युनिस्ट आणि शेतकरी यांच्यांतील एकी फोडण्यासाठी जपानी सैनिकांनी हर-तऱ्हेचे प्रयत्न केले. जी जी खेडी कम्युनिस्टांची म्हणून संशय येईल, त्यांच्यावर क्रूरपणे सूड उगविण्यास त्यांनी आरंभ केला आणि त्याचा परिणाम उलटाच झाला. वतागलेले शेतकरी अधिक चेवाने कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली लढू लागले.

डिसेंबर १९३७ पर्यंत जपानी सैन्याने पेकिंगवर ताबा मिळविला होता आणि आपल्या अधिकाराखाली एक तात्पुरते चिनी सरकार पेकिंग येथे स्थापन केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून उत्तर सीमेवरील होपेई, शान्सी आणि चर्हार या प्रांतांत कम्युनिस्ट, कोमिंटांग आणि अपक्ष यांनी एकत्र येऊन चीनचे सीमा सरकार स्थापन केले. या सीमा सरकारला नानकिंग सरकारची मान्यता होती.

आपल्याला मिळालेल्या संधीचा कम्युनिस्टांनी आणि लाल सेनेने पुरेपूर उपयोग करून घेतला. अनेक तऱ्हेच्या नवनवीन युक्त्या, प्रयुक्त्या लढवून कम्युनिस्टांनी शेतकऱ्यांना आपलेसे केले आणि जपान्यांशी लढण्यास त्यांना उद्युक्त केले. नियमित सैन्य, गनिमी सैन्य आणि लोकसैन्य असे लाल सैन्याने आपले ठोकळ भाग या जपान प्रतिकाराच्या युद्धात पाडले होते. लाल सैन्याच्या पथकांमधून निर्माण झालेले, लष्करी गणवेश घातलेले, सर्व तऱ्हेच्या शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेले व विलक्षण गतिमानतेने चढाई करणारे, असे नियमित सैन्य होते. गनिमी सैन्यदेखील पूर्ण वेळ सैनिकी काम करणारी पथकेच होती. पण या सैन्याची हालचाल ठरवून दिलेल्या प्रदेशापुरतीच मर्यादित असे. लष्करी गणवेशाच्या तुटवड्यामुळे हे गनिमी सैन्य गणवेशशिवायच वावरत असे. आपापल्या गावांत आणि तालुक्यांमध्ये लष्करी कारवायामध्ये भाग घेणाऱ्या स्त्री-पुरुषांची लोकसेना बनलेली असे. जरूर पडली तर या लोकसेनेतील सैनिक प्रत्यक्ष लढाईतही भाग घेत. एरवी हेरगिरी, रस्ते तयार करणे, लष्कराला सामग्रीचा पुरवठा करणे देणे अशी कामे लोकसैनिक करीत.

## कामाची विभागणी

नियमित लाल सैनिक आघाड्यांवर लढत असताना गनिमी सैनिक आणि लोकसैनिक यांच्या कारवाया जपानी आघाड्यांच्या सतत पिछाडीला चालू होत्या. स्त्री-पुरुष, वृद्ध, मुले सारे हिरीरीने या जपानी प्रतिकारात भाग घेत होते. त्यांच्याजवळ शस्त्रे नव्हती, दारूगोळा नव्हता. पण लाल सैनिकांनी त्यांना साधी, सोपी, नवनवी शस्त्रे तयार करण्यास शिकविले. लाकडाच्या ओंडक्यांपासून तयार केलेल्या तोफा, दगडात छिद्रे पाडून केलेले सुरुंग, घरोघरी तयार झालेले हातबॉम्ब सर्वत्र जपान्यांविरुद्ध सर्रास वापरले जाऊ लागले. बंदुकीत किंवा सुरुंगांत ठासण्याची दारू कोळसे, रेती आणि गंधकापासून घरोघर तयार केली जाऊ लागली. जपानी सैनिकांच्या जाण्या-येण्याच्या रस्त्यावर सुरुंग लावण्याची कामे लहान पोरेसोरे करू

लागली. नकली हातबाँब आणि बंदुका हा लहान मुलांचा खेळ बनला. युद्ध आणि जपान्यांचा प्रतिकार हा त्या चिनी शेतकऱ्यांचा जीवनाचा एक भागच बनला होता.

## निरपराधी जीवांची हत्या

सारा चिनी शेतकरी अशा तऱ्हेने पेटून उठण्याचे कारण जपानी सैन्याचे–विशेषत: जपानी अधिकाऱ्यांचे–क्रौर्य. जपानी सैनिक लाल सैन्याच्या हाती सापडत, तेव्हा त्यांना कधीच ठार केले जात नसे. लाल सैन्य नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांना शिक्षण देऊन त्यांच्यांत बदल घडवून त्यांचाच उपयोग केला जाई. अशा जपानी सैनिकांनीच जपानी अधिकाऱ्यांच्या क्रौर्याची अंगावर काटा आणील, अशी वर्णने लिहून ठेवली आहेत. बीभत्स आणि अतिशय भयप्रद वर्णने टाळून एक साधे वर्णन असे आहे—

..." एक दिवस आमचा सेकंड लेफ्टनंट ओनो आम्हांला म्हणाला–'तुम्ही आतापर्यंत कुणालाच ठार मारले नाही तरी ठीक आहे. आज आपण ठार मारण्याची सवय करूया. पहिली गोष्ट म्हणजे चिनी लोक ही माणसे आहेत असे मनात ही आणू नका. कुत्र्या-मांजरांपेक्षाही कमी दर्जाचे प्राणी आहेत. ठीक आहे. आता ही ठार मारण्याची सवय करण्याकरिता कोण पुढे येतो–चला पटापट–' आमच्यापैकी कुणीच हालले नाही, तेव्हा तो ओरडला–' भित्रे, नामर्द ! तुमच्यापैकी एकही स्वत:ला जपानी शिपाई म्हणवून घेण्याच्या लायकीचा नाही. ठीक आहे, मी



*लांकडाच्या तोफा खांद्यावर घेतलेले लाल सैनिक*
*ओंडक्यात ३ इंच व्यासाची छिद्रे पाडून या तोफा करीत.*

सांगतो ' आणि त्याने एकेका सैनिकाचे नाव पुकारण्यास सुरुवात केली. ओतानी– फुरुकावा– उयेनो– तजीमा (बापरे– माझेही नाव). थरथरत्या हातांनी मी माझी बायोनेटची बंदूक वर उचलली तो लेफ्टनंट वेड्यासारखा माझ्या नावाने शिव्या देत पुढे होण्यास सांगत होता. समोरच एका खड्ड्यासमोर एक गरीब चिनी उभा होता. तो खड्डा त्यानेच खणला होता. भीतीने कापणाऱ्या त्या चिन्याच्या दिशेने मी हळूहळू निघालो. मनातल्या मनात त्याची क्षमा मागितली. डोळे मिटले आणि लेफ्टनंटच्या शिव्या कानांत घुमत असतानाच बायोनेट त्या गरीब चिन्याच्या अंगात खुपसली. डोळे उघडले, तेव्हा तो खड्ड्यात कोसळला होता. ' खुनी–गुन्हेगार– ' मी मोठ्याने ओरडलो. "

असे कितीतरी निरपराधी चिनी क्रूरतेने मारले जात होते, आणि या कथा जसजशा पसरत होत्या तसतसे चिनी शेतकरी अधिकाधिक पेटून उठू लागले. त्यांच्यांत कम्युनिस्टांचा प्रचार जबरदस्त होता. त्यांना योग्य ते मार्गदर्शन कम्युनिस्ट पक्षच करीत होता. त्यामुळे ते झपाट्याने कम्युनिस्टांकडे आकर्षित होऊ लागले. युद्धाची व्याप्ती जसजशी वाढू लागली, जपानी सेना जसजशा पुढे सरकू लागल्या, तसतशा त्यांच्या पिछाडीवरील या गनिमी कारवाया वाढू लागल्या. कम्युनिस्ट त्यांच्यांत नुसताच प्रचार करून थांबत नसत तर त्यांच्या संघटना वाढवायचे काम ते आपणहून स्वीकारीत. त्या त्या ठिकाणी स्थानिक सरकार स्थापन करण्यासही ते मदत करीत. शासनाचे शिक्षण स्थानिक शेतकऱ्यांना देत आणि इतरही सर्व तऱ्हेचे शिक्षण ते झपाट्याने देत. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी लाल सैन्य जाई तिथली तिथली जनता आपोआपच कम्युनिस्टांकडे आपले त्राते म्हणून आदराने बघू लागे किंवा कम्युनिस्टांशी ती एकरूपच होऊन जाई.

दुसरे महायुद्ध संपले, तेव्हा चिनी-जपानी युद्धही संपले. १९३७ ते १९४५ च्या या आठ वर्षांत लाल सैन्याने जनरल चुह-तेह, पेंग-तेह-हूई, चाऊ-एन-लाय आणि लिन पियाओ यांच्या नेतृत्वाखाली आश्चर्यजनक पराक्रम गाजवले. लाल सैन्यही त्या वेळी नावापुरते चँग-कै-शेकच्या आधिपत्याखाली होते. या सैन्याला ' एट्थ रूट आर्मी ' असे नाव दिले गेले होते. आणि या सैन्याच्या पराक्रमाच्या एकेक कथा सबंध चीनभर पसरत होत्या आणि हळूहळू सर्वत्र लाल सैन्याविषयी एकप्रकारचे आदराचे आणि सहानुभूतीचे वातावरण निर्माण होऊ लागले होते.

या दरम्यान सोव्हिएट तळांची आणि लाल सैन्याची वाढ विलक्षण वेगाने झाली. १९४५ च्या अखेरीस उत्तर चीनमधील सुमारे १४ कोटी लोकसंख्येचा प्रदेश लाल सैन्याच्या आधिपत्याखाली होता. १९३७ साली चिनी–जपानी युद्ध सुरू झाले, तेव्हा लाल सैन्याची संख्या होती सुमारे १ लाख. युद्ध संपले तेव्हा ही संख्या सुमारे दहा लाखांपर्यंत गेली होती !

परंतु ही वाढ सुखासुखी होत नव्हती. चँग-कै-शेकच्या आणि त्याच्या आत्यंतिक

उजव्या गटांच्या डोळयांत कम्युनिस्टांचे यश सलतच होते. कम्युनिस्टांना असेच रान मोकळे मिळाले तर आपली धडगत नाही, हे चँग जाणून होता. अशा परिस्थितीतच १९४० साली एक गंभीर घटना घडली आणि त्यामुळे कम्युनिस्ट व कोमिन्टांग यांच्यांतील परस्परांविषयीचा दवलेला अविश्वास उफाळून वर आला. पुन्हा संशयाचे वातावरण निर्माण झाले. आणि ही हातमिळवणी फार काळ टिकणार नाही, असे स्पष्ट दिसू लागले.

(अपूर्ण)

---

Statement about ownership and other particulars

('MANOOS' Weekly)

FORM IV

(See Rule 8)

| | |
|---|---|
| 1. Place of Publication | POONA |
| 2. Periodicity of its publication | Weekly |
| 3. Printer's Name | S. G. Mazgaokar |
| Nationality | INDIAN |
| Address | 419 Narayan Peth, Poona 2 |
| 4. Publisher's Name<br>Nationality<br>Address | As above |
| 5. Editor's Name<br>Nationality<br>Address | As above |
| 6. Name and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per-cent of the total capital. | Rajhansa Prakashan<br>419 Narayan Peth,<br>Poona 2.<br>(1) S. G. Mazgaokar<br>(2) B. M. Purandare |

I, S. G. Mazgaokar, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 4—3–1967

Signature of Publisher
S. G. Mazgaokar

---

# मानवी जीवनाचा भव्य आलेख

**वि. शं. पारगावकर**

मराठी ललित वाङमयाच्या इतिहासात डॉ. रंगनाथ देशपांडे यांचे नाव आले तेव्हा त्यांच्या वयाची साठी उलटलेली होती. वास्तविक हे वय निवृत्त होण्याचे, एका तृप्त दृष्टीने तरुण पिढीच्या कार्याकडे पाहण्याचे. थोडक्यात म्हणजे कृतार्थ भावनेने उर्वरित जीवनाकडे बघायचे.

परंतु रंगनाथ देशपांडे यांच्या बाबतीत हे चक्र उलटया गतीने फिरू लागलेले आहे. ऐन तारुण्यात आय. सी. एस्. ची परीक्षा देऊन नव्या हुरूपाने नोकरीवर रुजू व्हावे, तसे देशपांडे यांचा हा ललित लेखनातील प्रवेश उत्साही वाटतो.

त्यांची पहिली कादंबरी 'आग्या मोहोळ.' तिच्यातील आशय मोठा, तसेच तिला लाभलेले यशही मोठेच; परंतु प्रत्यक्ष त्या कादंबरीच्या लेखनात त्यांनी मिळविलेले यश मर्यादित. ही त्यांच्या क्षेत्रातील पहिल्या पदार्पणातील यशापयशाची त्रिसूत्री आहे, असे मला वाटते.

'आग्या मोहोळ'मधील अनुभव निःसंशय श्रेष्ठ होते, अतिशय संपन्न तितकेच मराठी कादंबरीला ते बव्हंशी अपरिचित होते. या पूर्वी पु. य. देशपांडे यांच्या 'काळी राणी' या कादंबरीत त्या तोंडावळयाचे काही अनुभव प्रकट झालेले आहेत. परंतु प्रामाणिकपणाच्या आणि संपन्नतेच्या बाबतीत रंगनाथ देशपांडे यांच्या 'आग्या मोहोळ'मधील अनुभव अधिक सरस होते.

परंतु इतके असूनही कादंबरीचे रूप आणि परिणाम या दृष्टचा 'आग्या मोहोळ'-ला म्हणावे तेवढे यश लाभू शकले नाही. हा दोष जीवनानुभवाच्या संपन्नतेचा नव्हता तर जीवनदर्शनातील कलात्मकतेच्या अभावाचा होता. सौंदर्याचा साक्षात्कार घडविण्यासाठी ज्या संयत रेखांची आवश्यकता असते त्याचाही अभाव कारणीभूत झाला होता, असे म्हणणे भाग आहे.

डॉ. देशपांडे यांची 'आग्या मोहोळ' ही पहिलीच कादंबरी होती. आणि मी वर म्हटले त्या वयात त्यांनी ती लिहिली होती. यावरून त्यांच्या लेखनातील यशापयश तिच्यावरून ठरविणे योग्य नव्हे. त्यांच्या कादंबरीमधून जे जीवन आले होते त्याची

# वेडी बाभळ :

संपन्नता, विक्षिप्तता, तीव्रता आणि विशालता यांची गरज मराठी ललित साहित्याला निश्चितपणे आहे; तेव्हा ज्या माध्यमातून जे जीवन यावयाचे आहे ते अधिक यशस्वीपणे यावे, अशी आशा रसिकांना त्यांच्याकडून होती.

त्याच उत्सुकतेने डॉ. देशपांडे यांच्या नव्या लेखनाकडे पाहिले जात होते. त्या उत्सुकतेला 'वेडी बाभळ' या दुसऱ्या कादंबरीचे खाद्य देशपांडे यांनी या वर्षी पुरविलेले आहे. आकाराने पहिलीपेक्षा ही कादंबरी मोठी आहे (५४५ पृष्ठे); तिच्यातील विषयाचा आवाका तर त्यांच्या पहिल्या कादंबरीपेक्षा किती तरी मोठा आहे, हे डॉ. देशपांडे यांचे पहिले लक्ष्यणीय यश मानावयास हवे.

या कादंबरीतील मुख्य नायिका कावेरी-बरोबरच इतर शेकडो पात्रे आलेली आहेत; इतकेच नव्हे तर अगदी साध्या-सुध्या पद्धतीने न येता आपापल्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वासमवेत आलेली आहेत. आनशी, विठी, चांगुणा, गिरिजा, सावित्री आणि इतर अगणित, तसेच सोनबा, दादा, भाऊ, नारायण, आणखी कितीतरी. ही

पु स्त के

सारी जीवने आणि त्यांचे भिन्न भिन्न आविष्कार, यांचा एक आलेख काढण्याच्या बाबतीत डॉ. देशपांडे यांनी निश्चित कादंबरीमध्ये फार परिश्रम घेतलेले स्पष्ट दिसते.

## गुंतागुंतीचे जाळे

ही एका खेडेगावातील एक विशिष्ट घराण्याची कथा आहे. कावेरी नावाची एक शहरी तरुण मुलगी या घराण्यातील एका गावंढळ तरुणाशी लग्न करून त्या गावी येते आणि या तरुण मुलीच्या निमित्ताने 'वेडी बाभळ' या कादंबरीची सुरुवात होते. तिच्यातील मुख्य विषय असा आहे की, कावेरी ही अजाण तरुण शहरी मुलगी खेडेगावातील लोकांचे जीवन सुधारण्याच्या धाडसी आकांक्षेने प्रेरित होऊन त्या खेड्यातील गावंढळ तरुणाशी लग्न करून खेड्यात पदार्पण करते आणि आशा–निराशेच्या वाऱ्यावर तिच्या जीवनाचा पतंग गोते खातो. शेवटी तेथील जीवन असह्य होऊन कावेरी ते घर, ते गाव सोडते; परंतु पुन्हा तिला परत यावेच लागते. 'श्रांत, क्लांत, विकल, विदीर्ण, डोळे खोल गेलेले, गाल उतरलेले, चेहऱ्यावर मूर्तिमंत कारुण्य आणि 'पराभूती' घेऊन तिला परत याच गावात, याच घरात परत यावे लागते!'

हा झाला 'वेडी बाभळ' या कादंबरीतील मुख्य कथासूत्राचा साधा आलेख. डॉ. देशपांडे यांनी एका विशिष्ट जाडीच्या रेषेने आखलेला आहे. परंतु या कादंबरीतील इतर उपकथानकांच्या पात्रांच्या रेषा उभ्या आडव्या, तशाच जाड–हलक्या आखल्या गेल्यामुळे त्यांचे एक भले मोठे गुंतागुंतीचे जाळेच या कादंबरीत विणले गेलेले आहे. या रेषा नुसत्याच एकमेकींना छेद देतात असे नव्हे तर मुख्य कथासूत्रालाही त्यांनी छेद दिलेला आहे. काही रेषांची जाडी मुख्यत: आलेख–रेषेच्या जाडीपेक्षा अधिक रुंद झालेली आहे. त्यामुळे एक कलाकृती म्हणून या कादंबरीच्या यशालाच केवळ बाध आलेला आहे असे नाही; तर तिने साधावयाचा परिणामही या गुंतागुंतीमुळे लुळा पडलेला आहे.

## संपन्न प्रसंग

कित्येक पात्रांच्या निमित्ताने या कादंबरीत निर्माण झालेले प्रसंग इतके संपन्न आणि दर्जेदार आहेत की त्या प्रसंगांची कादंबरीत नीट बूज राखली असती तर डॉ. देशपांडे यांना त्यांनी फार मोठे यश मिळवून दिले असते. घरातील विधवा म्हातारी आणि तिच्या मनातला राजेखान पठाण. त्याच घरातला कर्ता पुरुष भाऊ आणि विधवा गंगाकाकी, तिचा मुलगा विठू, भाऊपासून झालेला. या घरातील चांगुणा आणि तिची विलक्षण निष्ठा, तसेच कावेरी गर्भार असतानाचे डॉ. देशपांडे यांनी पहिलटकरणीच्या अवस्थेचे केलेले रेखीव वर्णन; एक ना दोन असे प्रसंग आणि कितीतरी वर्णने या कादंबरीच्या यशाची उंची वाढवितात. परंतु कादंबरी वाचून संपविल्यावर शेवटी मनात विचार येतो तो असा की, हे यश कादंबरीचे का तिच्यातील विक्षिप्त, तीव्र आणि तितक्याच सुंदर प्रसंगांचे?

वाचकाला पडत असलेला हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे, कुठल्याही कलाकृतीच्या आणि कलावंत लेखकाच्या यशाच्या दृष्टीने !

विशेषत: कादंबरीमध्ये जे जीवन येते ते फार पारखून घेण्याचे आणि संयम राखून घेण्याचे आणि संयम राखून वापरण्याची मोठी जबाबदारी लेखकावर येऊन पडलेली असते ! याचे एखादे उदाहरण देताना मला पेशवे पार्कमधील त्या छोट्याशा रंगीत फुलराणीची आठवण होते. त्या फुलराणीत बसण्यासाठी लहान मुलांबरोबरच मोठी मुले आणि मोठ्या मुलांबरोबरच मध्यम वयाच्या स्त्रिया आणि उतार वयाला लागलेले पुरुषही धडपड करीत असतात. त्यामुळे तेथील गाडीवर कुणाला आत सोडायचं आणि कोणाला बाहेर ठेवायचं याची जबाबदारी असते !

निरनिराळे प्रसंग कादंबरीकाराभोवती अशीच गर्दी करून उभे असतात ! कादंबरीच्या 'फुलराणीत' त्यांपैकी कोणाला सोडायचं आणि कोणाला ठेवायचं हे कादंबरीकाराला ठरविता आले पाहिजे. कादंबरीकाराला इतर कुणाहीपेक्षा या प्रसंगाचा मोह फार जबरदस्त असतो. हे आगंतुक प्रसंग जणू मायावी रूप धारण करून आलेले राक्षसच असतात. त्यांना भुलून जर का एकदा तुम्ही त्यांना आत घेतलेत की मग ते आपलं खरंखुरं रूप प्रगट करतात आणि कादंबरीतील मुख्य पाहुण्यांच्या मानगुटीवर बसतात !

डॉ. देशपांडे यांना अजून अशा आगंतुक प्रसंगांवर मात करता आलेली नाही, असे खेदपूर्वक नमूद करावेसे वाटते.

'वेडी बाभळ' या कादंबरीत माझ्या मते अंदाजे पन्नास तरी लहानमोठी पात्रे आहेत आणि पात्रांच्या तिप्पट प्रसंग तर सहज असतील ! या सर्वांचा मिळून एकच एक सुंदर आकृतिबंध निर्माण करणे किती कठीण काम आहे, याची कल्पना करावी !

परंतु हा एक दोष सोडून दिला तर डॉ. देशपांडे यांची 'वेडी बाभळ' ही नवी कादंबरी त्यांच्या कादंबरी लेखनातील यशाचा दुसरा टप्पा ठरावी, एवढी लक्षणीय निश्चितच आहे.

[ वेडी बाभळ : डॉ. रंगनाथ देशपांडे; कि. १५ रु.
प्रकाशक : श्री लेखन वाचन भांडार, पुणे २ ]


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस
सहा साहसे — दा. सी. देसाई
मूल्य प्रत्येकी दोन रुपये
राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

वार्ता । ऊर्दू

संकलक : हिदायत खान

## □ उर्दूची अवस्था

उर्दू भाषेबाबत नियुक्त करण्यात आलेल्या 'जिले अंजुमने तरक्की उर्दू व हिंद' या कमिशनने आपला अहवाल नुकताच सादर केला असून त्यात खालील बाबींकडे लक्ष वेधण्यात आलं आहे—

१. नागपूर युनिव्हर्सिटीमध्ये उर्दूला पूर्वीचेच स्थान मिळावे.

२. सर्व जिल्ह्यांनी आपापल्या शैक्षणिक तपासणीचे रिपोर्टस् १५ फेब्रुवारीपर्यंत दरवर्षी सादर करावेत.

३. सरकारी नोकरांना पुढील बढतीसाठी द्याव्या लागणाऱ्या खात्यांच्या परीक्षा वा चाचण्यांमध्ये उर्दू भाषिकांना अधिकतर वाव असावा.

४. मालापूर येथील सरकारी ट्रेनिंग कॉलेजात नोकरी करणाऱ्यांबरोबरच खासगी विद्यार्थ्यांनाही प्रवेश असावा.

५. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विद्यार्जनात मदत देणाऱ्या संघटना जिल्ह्यात सर्वत्र असाव्यात. म्हणजे शिक्षणाच्या प्रसाराचे लोण खालच्या थरापर्यंत पोचू शकेल.

६. महाराष्ट्रांतील उर्दू माध्यमातील शिक्षणासाठी ट्रेनिंग कॉलेजातही उर्दू माध्यमाची सोय असावी किंवा तशी स्वतंत्र ट्रेनिंग कॉलेजेस् स्थापन करावीत.

७. विद्यार्थिनींसाठी वेगळ्या माध्यमिक शाळा असाव्यात.

८. सरकारी व निमसरकारी गॅझेट, बुलेटिन, नियतकालिके इत्यादी इतर भाषांप्रमाणेच उर्दू भाषेतूनही प्रसिद्ध करावीत.

९. निरनिराळ्या ठिकाणी उर्दू शाळा उघडण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदांनी जनतेला आवाहन करावे, त्यासाठी एखादी शिक्षण समिती नियुक्त करावी.

सारांश, सदर अहवालात उर्दू भाषेच्या उत्कर्षासाठी शक्यतो हरप्रकारचे प्रयत्न व्हावेत, अशी कळकळ दिसते; परंतु पुण्यासारख्या विद्येचे माहेरघर असलेल्या शहरात उर्दूबाबत काही जणांचा काय दृष्टिकोन आहे पाहा.

पुण्यातील एका जुन्या उर्दू माध्यमातील हायस्कूलमध्ये गेल्या वर्षी ५ व ६ वी चे वर्ग बंद करून इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करण्याचा प्रयत्न झाला होता!

उर्दू भाषेच्या अभिमान्यांनी आणि कमिशनने याची दखल घेतलेली नाही काय?

सदर उर्दू माध्यमातील शाळेच्या स्थापनेसाठी ज्यांनी हाडाची काडे केली होती, त्यांच्या आत्म्याला ही बातमी ऐकून काय वाटले असेल ?

'उर्दू टाईम्स' १३-२-६७

## □ महिला व देशसेवा

'ही शेवटचीच सार्वत्रिक निवडणूक होय !' असं जरी निराशावादी म्हणत असले तरी आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी निवडणुका झाल्या आहेत, तेथील वार्ता व फोटों-वरून जनतेत निवडणुकीविषयी कमालीचा उत्साह असल्याचेच सिद्ध होते. एवढेच नव्हे तर निवडणुकांत स्त्रिया विशेष उत्साहाने भाग घेताना दिसताहेत. मुस्लिम स्त्रियाही बुरखे घालून मतदानासाठी रांगेत उभ्या असलेल्या दिसत आहेत. कदाचित् देशाची प्रमुख एक स्त्री, म्हणूनही हा उत्साह असू शकेल !

तथापि आपल्या देशात अद्यापही ९० टक्के स्त्रिया अशिक्षित आहेत. त्यादृष्टीने देशसेवेसाठी त्यांचा उपयोग फारसा होऊ शकत नाही. परंतु थोड्याफार शिकलेल्या स्त्रियांकडूनही 'फ्लॅग-डे 'प्रमाणे वर्गणी जमा करणे वगैरेंसारखी कामे करून घेता येण्यासारखी आहेत.

तसेच रु. १,००० पर्यंत पगार असणाऱ्या गृहस्थांच्या स्त्रियांना अशिक्षित भगिनींना शिकविणे, त्यांना सामान्य ज्ञानाची महती पटविणे इत्यादी गोष्टी करता येतील.

सध्या भारतात 'ऑल इंडिया वुईमेन्स कॉन्फरन्स'च्या ४९ शाखा असून ६६,००० सदस्य आहेत. 'नॅशनल कौन्सिल फॉर वुईमेन 'च्याही ११ शाखा देशभर कार्य करीत आहेत. या संघटनेच्या तीन शाखांमधून उत्कृष्ट नर्सेस तयार केल्या जातात.


जिनिव्हाच्या 'ईसायी-खातून इदारा 'च्या जगात ७० शाखा आहेत. स्त्रियांचा सर्वांगीण विकास करण्यातही संस्था कार्यरत आहे. नावावरून ती जातीय वाटत असली तरी ती सर्वच जाति-जमातींतील स्त्रियांच्या उद्धाराचे महान् कार्य करीत आहे. सदर संस्थेच्या "Symca" या सुटसुटीत नावाच्या चार शाखा भारतात असून पहाडी व हवेच्या ठिकाणी स्त्रियांकरवी त्यांनी हंगामी हॉटेल्स व लॉजिंग बोर्डिंग्स उघडलेली आहेत.

स्त्रियांकडून आणखी एक कार्य चांगल्याप्रकारे होऊ शकते, ते म्हणजे राष्ट्रद्रोही हुडकून काढणे. तसेच वर्गणी गोळा करण्याच्या कामातही त्यांची कार्यक्षमता वाखा-णणीय असते. आणि खरं म्हणजे स्त्रियांना वर्गणी द्यायला सहसा कोणी खळखळही करीत नाही !

'इन्कलाब' १९-२-६७

●

# तुमचे भविष्य आमचा अंदाज




**श्री. [illegible]गो. जोशी**

सायनाचार्य, नासिक


४ ते ११ मार्च १९६७

**मेष** : या वेळी अकराव्या सूर्याचे छत्र तुमच्या मस्तकावर असल्याने शनि-मंगळांची झळ फारशी लागू शकणार नाही. तरीसुद्धा एकंदरीत हे दिवस अस्वास्थ्याचेच. काही ना काही कुरकूर जाणवतच राहील.

असे असूनही हा आठवडा खूपच धाईगर्दीचा, धावपळीचा जाणवेल. दूरचे दौरे काढावे लागतील, सभासंमेलने गाजवावी लागतील. चारचौघांत प्रतिष्ठेने मिरवावे लागेल. एकंदरीत वरवर दिसायला तुम्ही ठीकठाक असलात तरी अंतर्मनाला अस्वास्थ्याचा अंगार चटके देत राहील. राजकीय क्षेत्रातील फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील, नाक मुठीत धरून पैसा उधळावा लागेल.

दि. ८–९–१० काहीसे अनुकूल दिवस.

**वृषभ** : शनि–शुक्र एकादशांत एवढी ग्रहस्थितीही तुमचा भविष्यकाल उज्ज्वल असल्याची ग्वाही देऊ शकेल.

या महिन्यात अनेक प्रगत व आकर्षक घटना घडून याव्यात. नव्या मंत्रिमंडळात तुमचे स्थान निश्चित होईल. नवा व्यवसाय धंदा उभारण्यात तुमचे हात गुंतले जातील.

आपणांस ज्योतिषशास्त्राचा प्रत्ययच पाहायचा असेल तर दि. ८ ते १६ मार्च

या कालाखंडाची नोंद ठेवा. प्रतिष्ठा–पैसा–लोकप्रियता–यश यांपैकी काहीही केव्हाही लाभू शकेल.

सांसारिक वातावरणही प्रसन्नतेने बहरेल. साहित्य–कला क्षेत्रांतील व्यक्तींना तर हा एक नवा पर्वकाल लाभल्यासारखा वाटू लागेल.

दि. ८–९–१० येथूनच आपल्या प्रगतीला प्रारंभ होणार आहे.

**मिथुन :** प्रत्येक पाऊल विचारपूर्वक उचलणे हे मिथुनेचे तंत्र तर सद्सद्विवेक बुद्धीला आवाहन करून कोणतेही कार्य करणे हा मंत्र. या प्रभावी तंत्रामंत्रामुळेच आपण आपल्या उज्ज्वल चारित्र्याची निर्मिती केलीत. हेच तत्त्व यापुढेही सतत आचरणात आणलेत तर तुम्हांला कोणत्याही ग्रहाची बाधा होऊ शकणार नाही.

या महिन्यात अनेक वैचारिक आंदोलने उठतील, अंतर्मनात प्रक्षुब्ध विचार थैमान घालू लागतील; पण तुमच्या नेहमीच्या तंत्रामुळे तुम्ही यातूनही मार्ग काढू शकाल. घवघवीत यश मिळवू शकाल.

या आठवड्यात आपणांस अनेक जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील आणि त्या यशस्वी करून दाखविण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

दि. ८–९–१० या काली अपेक्षेप्रमाणे सर्व काही घडावे.

**कर्क :** गुरु–शनीची अनुकूलता विरुद्ध चौथ्या मंगळाची प्रतिकूलता, अशी ही या वेळी तिरंगी लढत सुरू आहे. सामना मोठा अटीतटीचा आहे यात शंकाच नाही. पण यशाची बाजू अधिक सामर्थ्यसंपन्न असल्यामुळे सध्याच्या परिस्थितीबद्दल चिंता करण्याचे मुळीच कारण नाही.

ताण खूप बसेल, खर्च अफाट होईल. पण अपेक्षित यश निश्चित पदरी पडेल सध्याचे दिवस फारसे स्वास्थ्याचे नसले तरी पराजयाची नामुष्की पत्करावी लागणार नाही.

कौटुंबिक अशांतता वाढेल, स्थावराचा प्रश्न चिघळेल, अनारोग्याच्या भेटीगाठी मधून मधून व्हायला लागतील. पण तरीसुद्धा तुमच्या प्रगतीला कोणीही प्रतिबंध करू शकणार नाही.

दि. ६ ते ८ अनुकूल दिवस.

**सिंह :–** 'पराक्रमस्थ मंगळ म्हणजे सर्व काही' तुमच्या बाबतीत तरी असं समीकरण मांडायला हरकत नसावी. कर्तृत्व + दैवाची अनुकूलता म्हणजेच सिंह-राशी व्यक्तींचे जीवन.

पराक्रमातील मंगळाची तुम्हांला सदैव साथ असल्यामुळे, या वेळी आपण जे जे मनात आणाल ते ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल. प्रज्ञा विकसेल, प्रतिष्ठा उंचावेल, तुमचे नाव सर्वतोमुखी गाजेल.

यांत्रिक–विद्युत क्षेत्रांत काही भरीव कार्य करण्याची संधी लाभेल आणि त्यामुळे महान् उद्योगपतींच्या यादीत तुमच्या नावाचाही समावेश केला जाईल.

या आठवड्यात प्रवास वरचेवर घडेल, धावपळीने अनेक कार्यक्रम यशस्वी होतील.

दि. ६–७–८ अनेक अनुकूल गोष्टी या काली घडाव्यात.

**कन्या :–** कन्या राशींची माणसे सहसा कुठेही केव्हाही आणि कशातही अपयशी ठरू नयेत, असेच त्यांना नियतीचे वरदान लाभलेले आहे. आणि याचा प्रत्यय यायला लागेल. या वेळीच अकराव्या गुरूच्या महन्मांगल्याचा साक्षात्कार याच महिन्यात घडू लागेल. आगामी सूर्य–गुरू त्रिकोण (दि. १५ मार्च) तुमच्या उज्ज्वल भविष्यकालाची प्रसादचिन्हे याच वेळी दर्शवायला लागेल. या आठवड्यात भंगलेल्या आशाआकांक्षा सांधल्या जातील, तुमच्या कर्तृत्वाला एक निराळे दालन उघडले जाईल.

भागीदारीतील संघर्ष मिटायला लागतील, इष्टमित्रांची अनुकूलता कोणत्याही क्षणी लाभू लागेल.

दि. ७ ते ९ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**तूळ :–** सध्याचा आपला काल फारसा अनुकूल नाही. आणि असे अनिष्ट कालाचे डोस केव्हा केव्हा मिळायला हवे असतात. त्याशिवाय अनुकूल कालाची महती तरी कशी लक्षात यावी ?

मंगळाचे सतत ४–५ महिने तुमच्या राशीतून संचलन सुरू राहणारच आहे. पण अशा कालीच जिद्द जागी होते, निर्धार पेटून उठतो, निष्ठा कसाला लागते.

या कालात पैसाअडका बरा मिळेल. व्यवहारधंदाही ठीक चालेल. पण स्वास्थ्य हरवल्यासारखे सतत वाटू लागले.

नोकरीधंद्यांतील समस्या सुटण्याची लक्षणे दिसायला लागतील. व्यवहारधंद्याचे बदललेले तंत्र यशस्वी ठरत असल्याचा साक्षात्कार घडू लागेल.

दि. ४–५–९–१० हे दिवस काहीसे अनुकूल.

**वृश्चिक :–** गुरु–शनी अनुकूल असूनसुद्धा बाराव्या मंगळाने व्यवस्थित बसलेली घडी काहीशी विस्कटली जाते, हितशत्रू मागील दाराने आत प्रवेश करू लागतात. हितचिंतक क्षणकाल नाराज बनतात.

पण तेवढ्याने काही साराच डोलारा कोसळेल असे काही नाही. मागयस्थ गुरूचा दारी खडा पहारा असल्यावर तो असे विपरीत कसे करू देईल ? पण हे दिवस सावध राहण्यासारखे आहेत. उगीच वाटेल तिथे जाऊन, वाटेल ते करून क्षम्य ठरणार नाही.

तात्त्विक संघर्ष उद्‌वतील व पेलण्यासारख्या जबाबदाऱ्या पत्कराव्या लागतील. मन मारून बरीचशी कामे करणे भाग पडेल.

दि. ७ ते ९ बरेचसे लाभ उठवाल.

**धनू :** – सूर्य पराक्रमात, मंगळ लाभात–दोन समर्थ ग्रहांची तुमच्यावर कृपादृष्टी असल्यामुळे, आता शनि-गुरूही तुमच्या वाटेस जायला टरकतील.

ज्या ज्या योजना आखलेल्या असतील त्या त्या आन्या आता गती घ्यायला लागतील. कधी न भेटणारी माणसे आता आपणहून साहाय्याला धावून येतील.

स्थावराच्या समस्या सुटायला लागतील, आवश्यक एवढा पैसा हाती यायला लागेल. मतभेद मिटून दिलजमाई होणेही आता शक्य आहे, असे वाटू लागेल.

असे आहे तरीसुद्धा सहजासहजी यश देणारा हा काल नव्हेच. धावपळ, धडपड खूपच करावी लागेल. नवे करारमदार होतील, कलाक्षेत्रात पाऊल पडेल.

दि. ६ ते ८ याच काली अंगीकृत कार्ये यश घेऊ लागतील.

**मकर :**– अंतरिक्षातील अनंत ग्रहांचे कृपाछत्र लाभलेली अशी एकमेव राशी मकरच. गुरु-शनी तर कोणत्याही कार्यात यश द्यायला कटिबद्ध आहेत.

वैज्ञानिक आणि संशोधन क्षेत्रांतील व्यक्तींना तर इतका चांगला काल यापूर्वी क्वचितच आला असेल. या काली धनोत्पादनाचे नवे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. जिवाभावाचे स्नेहसंबंध निर्माण होतील. या वेळी आपणांस अधिकार तर एवढा लाभेल की, अनेकांनी तुमचा हेवा करावा.

शैक्षणिक यश, सामाजिक प्रतिष्ठा, औद्योगिक उत्क्रान्ती यांपैकी काहीही केव्हाही घडावे. तुमच्या जीवनातील अपेक्षासाफल्याचा काल हाच.

दि. ८ ते १० या वेळी चिरंतनस्मृतीच्या घटना घडाव्यात.

**कुंभ :**–गेल्या महिन्यापासूनच तुमच्या प्रगतीचा आलेख वरवर चढू लागलेला आहे. या वेळी त्याहीपेक्षा वर जाईल. आता माघार नाही. अपयशाची तर मुळीच भीती नाही. या काली वरचेवर प्रवास करावे लागतील, बदली-बढतीचे योग कोणत्याही क्षणी निर्माण होतील. प्रामुख्याने यांत्रिक-विद्युत्-रासायनिक क्षेत्रांतील व्यावसायिकांना या वेळी फारच मोठे यश लाभेल. नवे स्थावर वाहन घेण्याचा योग येईल. औद्योगिकक्षेत्र व्यापक व विशाल बनेल. अनेक समर्थ व धनिक व्यक्तींचे सहकार्य लाभल्याने तुमच्या साऱ्या भव्य योजना यशस्वी होतील.

दि. ४ ते ६ या काली अनेक लाभ उठवू शकाल.

**मीन :**– या वेळच्या साऱ्या ग्रहांनी तुमच्याविरुद्ध बंड पुकारलेले असल्याने, काहीही न करण्यासारखा शहाणपणा नाही. उगीच धावपळ-धडपड करण्याने पदरी पडेल फक्त पश्चात्ताप, अवहेलना.

या काली प्रकृतीला विशेषच जपा. आठवा मंगळ आणि तोही वक्री. यांमुळे, अनेक कटकटींना आपणांस तोंड द्यावे लागेल. पैसा पाण्यासारखा खर्चूनही अपेक्षेप्रमाणे काहीच घडणार नाही. दूरच्या प्रवासाचे टाळा आणि पैशाअडक्याच्या व्यवहाराबद्दल सतत दक्ष राहा.

दि. ६ ते ८ हाच थोडाफार अनुकूल काल.

सुधाकर राजे

# भिंतीच्या तुंबड्या

## □ टूथपेस्ट बत्तिशी

टूथपेस्टच्या जाहिरातींतल्या माणसाप्रमाणे दिमाखाने दात विचकू शकणाऱ्या भाग्यवान् मंडळींत अस्मादिकांची गणना होत नाही, याचे जरासे विचित्र कारण म्हणजे अस्मादिकांचे गणित कच्चे आहे. एकजात सगळ्या टूथपेस्ट कंपन्यांच्या जाहिराती लक्षपूर्वक वाचल्यावर एक गोष्ट माझ्या ध्यानात आली; ती म्हणजे एक टूथपेस्ट कंपनी म्हणते, ७१ टक्के लोक आमची टूथपेस्ट वापरतात, दुसरी कंपनी म्हणते, ८३½ टक्के लोक आमचीच टूथपेस्ट वापरतात, तर तिसरी कंपनी म्हणते, ८९¾ टक्के लोक फक्त आमचीच टूथपेस्ट वापरतात. आता जगात एकूण लोक फक्त शंभर टक्केच असताना प्रत्येक कंपनीला केवळ आपलीच टूथपेस्ट वापरणारे एवढे लोक कसे सापडले हा अजब हिशेब अस्मादिकांच्या टणक टाळक्यात न शिरल्याने कुठलीही टूथपेस्ट वापरण्यापेक्षा दातणच बरे असा मी पोक्त विचार केला आहे. शिवाय हसतील त्यांचे वेडेवाकडे दात दिसतील या म्हणीला अनुसरून आपण हसायला जायचे अन् आपलेच हसे व्हायचे, ही भीती आहेच.

तरीदेखील कुठल्याही टूथपेस्टचा उद्देश शेवटी दात स्वच्छ करणे हा असावा असे मी भाबडेपणाने गृहीत धरले होते.—अन नेमके तेच चुकले; कारण, एका अमेरिकन कंपनीने आता दात स्वच्छ करणारी नव्हे तर अपघात टाळणारी टूथपेस्ट काढली आहे. म्हणजे ती लावली की दात अंधारात चमकतात व रात्री रस्त्याने चालताना एकदम समोरून मोटार आली तर हेडलाइटच्या प्रकाशात दात चमकून मोटारवाल्याला आपला पत्ता लागतो व अपघात टळतो. – याला म्हणतात डोके! अंधाऱ्या रात्री रस्त्याने चालताना मोटारीखाली सापडू नये म्हणून काय करावे? माझ्यासारख्या बिनडोक माणसाने उत्तर दिले असते की जपून फूटपाथवरून चालावे. पण ही डोकेबाज अमेरिकन टूथपेस्ट कंपनी म्हणते, छे, छे! असा गांवढळपणा करू नये. ती म्हणते, समोरून मोटार अंगावर आली कीं एकदम तिच्यासमोर उडी मारावी, अन् तिच्या हेडलाइटच्या प्रकाशात जबडा रुंद पसरून हस्तिदंती करावी. बत्तिशी चमकली, की ड्रायव्हर चमकलाच म्हणून समजावे.

छान! मोटार अंगावर आली की निर्माण होणाऱ्या जीवन—मरणाच्या समस्येची पूर्ती अशी अक्षरश हसत होऊ शकेल याची कल्पना माझ्या पादचारी जीव-

नात मला कधीच सुचली नव्हती. आता समस्त पादचाऱ्यांना मोटारीपासून अभय आहे, यात शंका नाही.–पण अंधारात एकदम खदखदा हसणाऱ्या दातांची चमकदार भुताटकी दिसल्यावर ड्रायव्हरने तेथल्या तेथे राम म्हटला तर! जाऊ द्या. त्याच्याशी आपल्याला काय करायचे आहे? मोटार चालविण्याचा घोर प्रसंग आपल्यावर या जन्मी तरी यायचा नाही; तेंव्हा त्या बाबतीतही आपल्याला अभय आहे.

## □ मच्छरांचे सेक्स अपील

शास्त्रज्ञांनी कुठला शोध लावावा याला आता काही धरबंद राहिलेला दिसत नाही. परवा एका शास्त्रज्ञाने असा शोध लावल्याचे वाचले की मच्छरांना स्त्रियांपेक्षा पुरुषांचे आकर्षण अधिक वाटते. घ्या! मच्छर, माशा, ढेकूण, चिलटे या सर्वांनाच माझे जबरदस्त आकर्षण वाटते, असा माझा नित्याचा अनुभव आहे; पण हा माझ्या 'पौरुषत्वा'चा परिणाम आहे, याची मला काय कल्पना? तसे पाहिले तर माझे व मिस् मच्छरचे तसे कधीच सूत जमले नाही. तरीदेखील अगदी हिंदी सिनेमात हिरॉईनच्या सहेल्या हीरोच्या भोवती फेर धरून गातात त्या थाटात मच्छर-मैत्रिणींचा तांडा रात्रभर माझ्याभोवती कोरस का म्हणत असतो, हे बेटे आज कळले.

आता मच्छराला (की मच्छरीला?) जे वाटते तेच माशीला वाटते काय? पुष्कळदा गुळाच्या खड्यांवर बसणारी माशी थोड्या वेळाने माझ्या नाकावर बसते; इतकेच काय, पण माझ्या हातातल्या गरम चहाच्या कपात (अर्थात् माझ्यासाठी) जीव देते. तेंव्हा त्याला माझ्या स्वभावातला गुळाहून अधिक गोडवाच कारणीभूत असावा, अशी आता मला रास्त शंका येऊ लागली आहे.

●

## □ लिपस्टिक विरुद्ध व्याकरण

न्यूयॉर्कची एक सौंदर्य-प्रसाधने तयार करणारी कंपनी पुरुषांसाठी लिपस्टिक काढणार आहे म्हणे! मला वाटलेच होते पुढेमागे असे काही तरी घडणार म्हणून. देवाने निर्माण केलेला लिंगभेद फक्त व्याकरणापुरता शिल्लक ठेवायचा, असा आधुनिक पाश्चिमात्यांनी चंग बांधलेलाच आहे; कारण तिकडे पुरुषांसारखी चड्डी घालते ती बाई असते, अन् मुलीसारखे लांब केस वाढवतो तो मुलगा असतो. देवाच्या करणीत एवढी सुधारणा केल्यावर स्त्री-पुरुष तादात्म्याची ही शेवटची पायरी ओघानेच आली.

# रा

# झ

## सिप्पी फिल्मस्चा राझ

## एक तकलुपी रहस्य

असली रहस्य चित्रपटांची हिंदीमध्ये विलक्षण वानवा आहे. येथे दिसतात ते रहस्याची फोडणी दिलेले प्रेमाचे चित्रपट. मूळ कथा प्रेमाची. त्याला उगाचच झालर चढवायची काहीतरी विलक्षण रहस्यमय प्रसंगांची. पुन्हा या प्रसंगांमध्ये रहस्य तसे काहीच नसते. सगळाच तकलुपी, नकली मामला. सिप्पी फिलमस्चा नवा ' राझ ' त्यातलाच; त्यात नावीन्य नावालासुद्धा नाही. दिसतात फक्त राजेश खन्ना व बबिता शिवदासानी यांचे नवे चेहरे. त्यांचे भांडवल जेवढे दिवस पुरेल तेवढचा दिवसांचे या चित्रपटाचे आयुष्य.

सी. जे. पावरी यांची कथाच मुळात बेगडी, नकली वाटते. हिंदी चित्रपटात असते तसल्याच रहस्याला त्यांनी उगाचच राजेरजवाडचाच्या पार्श्वभूमीवर उभे केले आहे. मुळात ही आहे कथा राजाची मुलगी सपना आणि एक सामान्य कामगार कुमार यांच्या प्रेमाची. राजाच्या लफडचामुळे त्याला काही खून करावे लागतात, कुमारचा काटा काढावा लागतो व म्हणून त्यात आले रहस्य. शेवटी अर्थातच राजा व त्याचे सगळे खुनी पथक पराभूत होते. कुमार व सपना यांचे प्रेम अमर ठरते. सपनाच्या आईची राजाच्या बंदिवासातून मुक्ती होते. सुमारे २०–२२ वर्षे राजाने चालविलेले जुलमी कपटनाटच संपते. राजा आपल्यासकट राजवाडा जाळून टाकतो. सबंध चित्रपटात पोलिसांचे काम आहे ते कुमार व त्याच्या साथीदाराने केलेली कामगिरी ऐकण्याचे व पेटता राजवाडा पाहण्याचे.

कथा जेवढी मामुली आहे तेवढीच पुढील सर्व अंगे–पटकथा, दिग्दर्शन, संकलन वगैरे–सामान्य आहेत. कुमार-सपना यांच्या प्रणयाचा विकास होत

असताना धरनागर यांनी लिहिलेले शेरयुक्त संवाद चांगले आहेत. मात्र आकाशवाणीसारखे ऐकू येणारे त्यांचे हे प्रणय-संवाद घेण्याची पद्धती ' ये रास्ते है प्यारके 'पासून इतकी वापरली आहे, की ती आता नको वाटते. दिग्दर्शक रवींद्र दवे यांच्या कामात काहीच कल्पकता दिसली नाही. ' बीस साल बाद ' जसा होता, ' वह कौन ' थी जसा होता तसाच, त्याहूनही डावाच— ' राझ 'ही आहे.

राजेश खन्ना व बबिता शिवरासानी ही अगदी नवी जोडी या चित्रपटात दिसते. फिल्मफेअरसारख्या मासिकांतून वेगवेगळ्या नटनट्यांची जसजशी वेगवेगळ्या मूडस्‌ची चित्रे येतात, तसेच निरनिराळे मूडस्, पोझेस धारण करण्याचा प्रयत्न दोघांमध्ये दिसतो. मूळ स्वतःचे असे काही कौशल्य त्यांच्यामध्ये आहे असे जाणवत नाही. केवळ मनोजकुमार, विश्वजीत किंवा आणखी कोणी नाही म्हणून तो राजेश खन्ना आहे व साधना किंवा तशीच कोणी नाही म्हणून ती बबिता आहे एवढेच. बबिताचे एक गाणे म्हणजे निव्वळ फॅशनपरेड आहे. पोझेसही अगदी तशाच. राजेश खन्ना फारच सामान्य वाटतो. त्याच्या चेहऱ्यावर हुशारी, तरतरी म्हणून काही नाहीच. फक्त चेहरे नवे आहेत एवढेच समाधान त्यांच्याकडून मिळते. बाकी सप्रू, रत्नमाला यांच्या भूमिका जशा ठरून गेल्या आहेत तसाच त्यांचा अभिनयही. त्याबाहेर त्यांच्याकडून काहीच मिळत नाही. आय. एस. जोहरचा भाबडा चेहरा हसवितो. ' जरा सोचो तो ' हे त्याचे लकबीचे वाक्य काही वेळा त्याच्या म्हणण्याच्या ढबीने खसखस पिकविते. हरिंद्रनाथ चट्टोपाध्यायच्या व्यक्तिरेखेला तसा अर्थ काहीच नाही. नायकाविषयी सहानुभूती बाळगणाऱ्यातला तो एक. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विराण गावात अचानक येऊन टपकलेल्या नायकाला उतरवून घेण्याचे काम त्याने केले आहे.

चित्रपटात निरर्थक, अनावश्यक गोष्टींचा भरणा बराच आहे. राजवाड्यातील कळीचा दरवाजा, आतील गुप्त खोल्या अगदीच नकली आहेत. नायक कुमार आणि ठाकूरसिंगाच्या मारामाऱ्या केवळ प्रेक्षकांना आवडतील म्हणून लांबवत ठेवल्या आहेत.

चित्रपटास संगीत कल्याणजी आनंदजी यांचे आहे. चाली जुन्याच आहेत. पार्श्वसंगीतात खास काही नाही.

बबिता पुढेमागे मोठी झालीच तर — होण्याची शक्यता आहे; कारण या चित्रपटातील तिचे एक ओलेते दृश्य फारच प्रक्षोभक आहे — तिचा पहिला चित्रपट एवढेच ' राझ 'चे महत्त्व सिनेइतिहासात राहील.

●

४ मार्च १९६७

# रंगभूमी

सुमारे एक वर्ष झाले असेल त्या गोष्टीला; 'आनंद संगीत मंडळी' चे चालक श्री. नानासाहेब शिरगोपीकर आणि मी 'नाटचलेखन' या विषयावर बोलत होतो. ठराविक चाकोरीबद्ध कथानके सोडली तर आजकाल मराठी रंगभूमीवर नवे असे काहीच येत नाही. कथानक, व्यक्तिचित्रण या दृष्टीने रंगभूमीवर कोणतीच प्रगती होत नाही, अशी माझी तक्रार मी त्यांच्यापुढे मांडली. त्या विचारांशी नानासाहेब काही अंशी जरी सहमत असले तरी ही गोष्ट त्यांनी पूर्णपणे मुळीच मान्य केली नाही. ते उत्तरले, " हा तुमचा आक्षेप खोडून काढण्याच्या संधीचीच मी वाट पाहत आहे; फार काय लवकरच तुम्हांला मी असे काही नवे दाखविण्याच्या विचारात आहे, की जे तुम्ही पूर्वी तर कधी पाहिले नसेलच. पण फार कशाला भारतीय रंगभूमीवरही असा प्रयोग कुणी केला नसेल. " नानासाहेबांच्या शब्दांतून व्यक्त होणारा आत्मविश्वास माझी उत्सुकता वाढविण्यास कारण ठरला. त्यामुळे त्यांचा हा प्रयोग आहे तरी कसा, असा प्रश्न मी त्यांना केला तेव्हा ते म्हणाले होते,

" नाटचप्रयोगाद्वारे शिक्षण देण्याची कल्पना वरीच वर्षे माझ्या मनात घोळत आहे. त्या दृष्टीने या नव्या संकल्पित नाटचप्रयोगाद्वारे १० वी व ११ वी च्या विद्यार्थ्यांना उपयोगी ठरेल, असे विज्ञान रसायन आणि जनरल सायन्सचे शिक्षण देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. "

नानासाहेबांची ही कल्पना मला त्या वेळी अशक्य वाटली.

तरीपण नानासाहेबांचे नवे नाटक केव्हा येणार याचीच मी वाट पाहत होतो. नुकताच 'परीक्षेपूर्वीच्या सात रात्री' चा प्रयोग पाहिला तेव्हा नानासाहेबांचे शब्द अक्षरशः खरे झाल्याचा अनुभव आला. पूर्वी मनात आलेल्या शंका तर व्यर्थ ठरल्याच, पण हा नवा प्रयोग विलक्षण क्रांतिकारी वाटला. काहीतरी नवे, चांगले आणि मुख्य म्हणजे उपयुक्त पाहिल्याचा आनंद झाला.

तीन तासांच्या या नाटचप्रयोगात भूगर्भशास्त्र, रसायनशास्त्र, शरीरविज्ञान, आरोग्यशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि प्राणिशास्त्र अशा सहा भागांचा समावेश केला असून प्रत्येक गोष्ट जास्तीत जास्त सोपी आणि रंजक करून सांगण्याची हातोटी विलक्षण वाटली. विद्याधर नावाच्या एका मुलाची परीक्षा अवघी सात दिवसांवर आलेली असतानाच त्याचा आत्मविश्वास डळमळू लागतो. वर्षभर खेळण्यात दिवस घालविलेला विद्याधर परीक्षेला न बसण्याचा विचार करू लागतो; ही गोष्ट त्याच्या वडिलांना मुळीच पसंत पडत नाही. ते स्वतः, त्याची मोठी बहीण त्याला शास्त्र

# परीक्षेपूर्वीच्या सात रात्री

नवी कल्पना नवे धाडस

विषय समजावून देण्याचे ठरवितात. आणि विषयाला सुरुवात होते. त्याची बहीण काही गोष्टी प्रत्यक्ष समजावून देण्याचा प्रयत्न तर करतेच. एक-दोघे शास्त्रज्ञ विद्याधरच्या स्वप्नात येऊन काही गोष्टी स्पष्ट करून सांगतात. नाटकातल्या विद्याधरप्रमाणे प्रेक्षकांतल्या विद्यार्थ्यांनाही साऱ्या गोष्टींत रस वाटू लागतो.

आता हे नाटक, शैक्षणिक गोष्टींवरच आधारलेले असल्याने आणि त्या व्यतिरिक्त दुसरी कोणतीही गोष्ट त्यात नसल्याने ज्यांना ह्या शिक्षणाची काहीही जरुरी नाही, त्यांना हा सारा प्रकार आरंभी मोठा कंटाळवाणा वाटतो. पण नाटकाचे सर्वांत मोठे यश हेच की, ज्यांचा या विषयाशी काहीही संबंध नाही तेही यात रंगून जातात. या दृष्टीने नाटकाचे पहिले महत्त्वाचे वैशिष्टच म्हणजे नाटकाची संवाद-रचना. ती जराही क्लिष्ट नाही. अगदी साध्या-सोप्या भाषेत प्रत्येक गोष्ट पटविण्याचा प्रयत्न केला आहे. रासायनिक सूत्रे सांगण्यासाठी, डोळ्यांचे कार्य, डासाचे कार्य, फुलाचे कार्य समजावून देण्यासाठी आकर्षक पद्यरचना केली आहे. त्यामुळे साऱ्या गोष्टी सहज लक्षात राहतात.

काही गोष्टी नुसत्या संवादानेही लक्षात राहणाऱ्या नसतात अशा वेळी त्या विशिष्ट गोष्टींचे महत्त्व पटविण्यासाठी, कार्य समजावून देण्यासाठी त्या प्रत्यक्ष उभ्या केल्या आहेत. साहजिकच त्याचा परिणाम मोठा होतो. स्टेजवर प्रत्यक्ष हाडांचा सापळा चालत येऊन त्याने फॉस्फरसचे महत्त्व आणि कार्य सांगणे किंवा सेफ्टी मॅचबॉक्सने स्वतःची कामगिरी आणि जन्माचा इतिहास सांगणे, जिभेने आपल्या कामाविषयी माहिती देणे, बेडकाने स्टेजवर येऊन आपली जन्मकथा सांगणे, अशा कितीतरी नावीन्यपूर्ण गोष्टींनी प्रयोगात एक आगळीच रंगत येते.

अशा या साऱ्या गोष्टी मनात सुचल्या तरी नाटकामधून

सुधीर दामले

त्यांची मांडणी करणे ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. पण तेव्हा अशा या साऱ्या कल्पना त्यांना सुचल्या तरी कशा हे विचारता ते उत्तरले, " वास्तविक पाहता व्यावसायिक दृष्टचा यशस्वी ठरतील, अशी नाटके काढण्याचा प्रत्येक निर्मात्याचा कल असतो आणि तो योग्यही आहे. या नाटकाचे तसे नाही. हे नाटक यशस्वी होईल, असे आधी कुणालाच सांगता आले नव्हते. फार काय हा प्रयोग फसणार असे म्हणणारे लोकच मला अधिक भेटले. पण बऱ्याच वर्षांपासून ही जी कल्पना माझ्या डोक्यात होती ती एकदा अजमावून पाहायचीच असे मी ठरविले होते. ' भाव तोचि देव ' या नाटकाने चांगलीच लोकप्रियता मिळविल्याने आर्थिकदृष्टचा मला थोडेसे स्वास्थ्य लाभले आणि माझ्या विचारांनी उचल खाल्ली ! "

" अशा तऱ्हेने रंगभूमीवर इतर विषयांचे शिक्षण देणे शक्य होईल का ? "

—" का नाही होणार ? जरूर होईल. भाषा विषय सोडला तर इतर कोणत्याही विषयाचे शिक्षण देता येईल. अर्थात शास्त्र विषयाची मला पहिल्यापासूनच गोडी असल्याने मी हा विषय निवडला इतकेच ! "

" नानासाहेब, अशा तऱ्हेचा प्रयोग भारतीय रंगभूमीवर तर कधी झाला नाहीच. पण पाश्चात्य रंगभूमीवर असे काही प्रयोग झाले असल्याचे तुमच्या ऐकिवात आहे का ? त्यावरून तर तुम्ही ही कल्पना उचलली नाही ना ? "—मी विचारले. तेव्हा नानासाहेब उत्तरले, " परदेशांत अभ्याससंबंधीच्या वेगवेगळचा विषयांवर आधारलेल्या छोटचा छोटचा फिल्म्स दाखविण्याची पद्धत आहे, असे मी ऐकले आहे; पण एका नाटकातून असे विविध विषय हाताळण्याची कल्पना तिकडेही कुणाला सुचलेली नसेल. माझी ही कल्पना अगदी पूर्णतः स्वतंत्र आहे. "

" तुमच्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यास तुम्हांला कालावधी किती लागला ! "

—" तसं पाहू गेले तर गेली अनेक वर्षे ही कल्पना मनात आहे, पण प्रत्यक्ष काम करायला लागून दोन वर्षे झाली. दोन वर्षांच्या सतत परिश्रमांनंतर, अनेक कल्पना अजमावून पाहत पाहत आजच्या प्रयोगाचे हे स्वरूप तयार झाले आहे. गेली दोन वर्षे मी रोज रात्री निजण्यापूर्वी एका शास्त्रज्ञाचे चरित्र वाचण्याचा क्रम ठेवला होता. त्यामधून मला नवीन नवीन माहिती मिळण्याचा प्रयत्न तर झालाच, पण त्यांच्या चरित्रातून स्फूर्ती मिळत असे. प्रत्येक शास्त्रज्ञाला आपला प्रयोग करताना किती मनःस्ताप सोसावा लागला असेल, हे लक्षात येई. आणि नवा हुरूप येई "

" हे नाटक शास्त्र या विषयावर आधारलेले असल्याने त्यात अचूकता येणे आवश्यकच होते. आणि ती आणण्यासाठी प्रत्येक गोष्ट दोन-दोनदा तीन-तीनदा करावी लागली. शेकडो रुपये नुसते खर्च होत राहिले. काही दिवसांनंतर असे लक्षात आले की ज्याची काहीही जरुरी नाही असे कितीतरी सामान आपण विकत घेतले आहे. लाकडाच्या बारीक सारीक वस्तू बनविण्याचे फ्रेटवर्कचे मशीन, निरनिराळी मॉडेल्स, एपिडास्कोप, वेगवेगळचा स्लाईडस घेतल्या. त्यांतील काही गोष्टी फक्त



नानासाहेब
शिरगोपीकर
( डॉ. फ्लेमिंग )
आणि
गौळण (रसना)

त्याच नाटकाकरता चालणाऱ्या आहेत. आमच्या व्यावसायिक नाटकाला त्यांचा काहीच उपयोग नाही, त्यामुळे प्रयोग अयशस्वी झाला असता तर सारेच फसणार होते. त्यामुळे या गोष्टींत पैसा गुंतविणे कठीण वाटू लागले. पण त्याचबरोबर परिपूर्णता येण्याच्या दृष्टीने त्या घेणेही जरूर वाटले. एकूण मनःस्तापच फार ! साध्या साध्या गोष्टींसाठी पायपीट, धावाधाव किती केली असेल याचा तर अंदाजच नाही. जेनिफर या शास्त्रज्ञाने शोध लावलेल्या देवीच्या लसीबद्दल सांगताना एका गवळणीकडून त्याला प्रथम या लसीची माहिती मिळाली, हे दाखविण्यासाठी मी गवळण स्टेजवर आणतो. आता या गवळणीचे कपडे जेनिफरच्या काळातले हवेत. ते शोधण्यास कोण यातायात पडली. कितीतरी चित्रे पाहिली तेव्हा योग्य असे कपडे मिळाले. डॉ. फ्लेमिंगच्या कोटाचे असेच ! त्याचा डॉक्टरी कोट लांब बाह्यांचा होता, आपल्या डॉक्टरांप्रमाणे आखूड बाह्यांचा नव्हता, ही गोष्ट लक्षात घेऊन तसा कोट बनविला. वरवर पाहता या गोष्टी साध्या वाटतील पण या नाटकात त्याच महत्त्वाच्या आहेत.

"शिवाय शाळेत या गोष्टी शिकवतात त्यापेक्षा काही वेगळ्या पद्धतीने शिकवाव्यात, असे मनात होते; त्यामुळे काही नावीन्य, गंमत आणण्याचाही प्रयत्न केला आहे. शाळेत मेंदू शिकविताना मेंदूचा अर्धा भाग दाखवितात. मी हॅट काढताच कवटीखालचा संपूर्ण मेंदू दाखविला; एवढेच नाहीतर मेंदू बाजूला काढून दाखविला आणि तो दूर करताच माणसाची शरीरक्रिया थंड पडते हेही दाखविले."

"हे सारे उभे करताना तुम्हांला कुणाचे साहाय्य किंवा मार्गदर्शन झाले का?–"

"माझा मीच साहाय्यक, आणि मार्गदर्शक होतो. माझ्या कारागिरांकडून काही गोष्टी करून घ्यायच्या म्हटल्या तरी त्यांना हा साराच प्रकार नवा असल्याने केवळ सांगून भागत नसे. दर वेळी स्वतः हजर राहून योग्य तसे करून घ्यावे लागे. माझे तंत्रज्ञ जसे या प्रकाराला नवखे होते, तसेच नाटकात काम करणारे कलाकारही अशा नाट्यप्रयोगात प्रथमच काम करणारे आहेत. शिवाय शास्त्रविषय मुळीच न शिकलेले आहेत. त्यामुळे त्यांना अगोदर प्रत्येक गोष्ट समजावून द्यावी लागत असे;

कारण, ह्या साऱ्या गोष्टी समजल्या नाहीत तर ते संवाद पाठ करू शकत नव्हते' कलाकारांना येत असलेल्या अडचणींचा एक उत्तम नमुना सांगतो. रेशमाच्या किड्याचे कार्य जगदीशचंद्र बोस विद्याधरला समजावून देत असतात. त्या वेळी रेशमाचा किडा वरून खाली पान कुरतडून खातो असे ते सांगतात. पण पानाकडे बोट दाखविताना मात्र खालून वर जातो, असे दाखवावे लागते. हा प्रकार काय हे आमचे कलाकार राजा बापट यांना समजेना. ते म्हणत, 'किडा वरून खाली जातो असे म्हणायचे आणि दाखवायचे मात्र खालून वर हे कसे?' तेव्हा मला त्यांना समजावून द्यावे लागले कीं पानाचे डोके नेहमी जमिनीकडे असते त्या डोक्याकडून देठाकडे जायचे म्हणजे वरून खालीच जाणे, अशा कितीतरी गोष्टी समजावून द्याव्या लागत. अर्थात् हा कलावंतांचा दोष आहे असे मुळीच नाही. ते कधी शाळेत हा विषय शिकलेच नाहीत. त्यांना हे कसे माहीत असावे? याचमुळे पाठांतर करतानाही त्यांना त्रास झाला. न पाहिलेल्या, माहीत नसलेल्या गोष्टींबद्दलचे संवाद पाठ करणे कठीण गेले. अजूनही कोणी मध्येच चुकले तर नाटक एकदम थांबते; कारण, एखादा शब्द विसरला तर त्या जागी दुसरा प्रतिशब्द घालणे अशा शास्त्र विषयात शक्य नसते आणि असलेच तर ते त्यांना सुचत नाही."

**नाटकाचे यश**

नानासाहेबांचे हे नाटक रंजक आहे, नावीन्यपूर्ण आहे यात वाद नसला तरी नाटकाचा पहिला अंक अति कंटाळवाणा होतो आणि त्याचा इन्कार नानासाहेबांनी मुळीच केला नाही. उलट त्या अंकात ज्या उणीवा राहिल्या आहेत त्या केवळ तांत्रिक साहाय्य कमी पडल्याने राहिल्या आहेत, हेही त्यांनी मनमोकळेपणाने कबूल केलें. ते म्हणाले, "मला जेवढे शक्य होते तेवढे मी केले आहे. उरलेल्या गोष्टींतील उणीवा मला दूर करता येणार नाहीत, असे मुळीच नाही. पण त्यात मला अडचण आली ती पैशाची! त्यावाचून मी त्या उणीवा दूर करू शकणारच नाही. रसायन-शास्त्र विषय घ्या. प्रत्येक पदार्थाची रासायनिक प्रक्रिया पडद्यावर दाखविणे अतिशय मनोरंजक ठरेल. पण त्यासाठी मोठमोठी प्लॅस्टिकची उपकरणी वापरावी लागतील. ती तयार करणे आज तरी शक्य नाही."

आता तीन तासांच्या या नाटकाने विद्यार्थ्यांस शास्त्र विषय संपूर्णतः समजला जातो, असा दावा नानासाहेबही करीत नाहीत. हा प्रयोग पाहून फक्त विद्यार्थ्यांची उजळणी मात्र नक्की होते आणि त्या दृष्टीने ते म्हणालेही, "माझा हा प्रयोग पाहून विद्यार्थ्याला एक मार्क जरी जास्त पडला तरी मी स्वतःला कृतकृत्य समजेन. कारण– दोन वर्षे सतत हा विषय शाळेत शिकून त्याला जे मार्क मिळणारे असतात त्यात या प्रयोगाने एक मार्काची भर पडते म्हणजे त्याचे केवढे मोठे काम होते? त्याच्या या मार्काचे प्रमाणच लक्षात घ्या. दोन वर्षांत ४० मार्क! तीन तासांत एक मार्क! याचाच अर्थ माझे काम सफल झाले आहे." ●

MANOOS (Weekly) 40 Paise : Regd. No. M H-649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स




स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर